Made with Xodo PDF Reader and Editor

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १८ फेब्रुवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३२४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे जोरदार धक्के

### काही सेकंदापर्यंत हलली जमीन, लोकांमध्ये भीतीचे वातावरण

नवी दिल्ली: दिल्लीमध्ये सोमवारी भूकंपाचे जोरदार हादरे जाणवले. काही सेकंदापर्यंत जमीन हलत होती. लोक भयभीत झाल्याने घराच्या बाहेर निघाले. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या माहितीनुसार हा भूकंप ४.० रिश्टर स्केल तीव्रतेचा होता.

याचे केंद्र दिल्लीच्या जवळ जमिनीपासून ५ किमी खोल होते. यामुळे याचे धक्के अधिक जाणवले. काही सेकंदापर्यंत जमीन हलत राहिल्याने इमारतींच्या आतमध्ये जोरदार कंपन जाणवले. भूकंप सकाळी ५ वाजून ३६ मिनिटांना आला. यामुळे लोकांची झोपच उडाली.

पंतप्रधान मोदींनी केले ट्वीट

पंतप्रधान मोदींनी एक्सवर एक पोस्ट करत लोकांना सावधानता बाळगण्याचे आवाहन केले. दिल्ली आणि जवळच्या परिसरात भूकंपाचे झटके जाणवले. सर्वांना शांत राहण्याचे तसेच योग्य ती सुरक्षा बाळगण्याचे आवाहन करतो. अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

अधिकाऱ्यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार भूकंपाचा केंग्र धौला कुआंमध्ये दुर्गाबाई कॉलेज ऑफ स्पेशल एज्युकेशनजवळ होता. जिथे भूकंपाचा केंद्रबिंदू होता तेथे एक नाला आहे. या परिसरात दर दोन ते तीन वर्षात एखादा लहान आणि कमी तीव्रतेच्या भूकंपाचे झटके बसत असतात. २०१५मध्ये येथे ३.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप आला होता.

# मुख्यमंत्र्यांबरोबरच एकनाथ शिंदे यांचाही स्वतंत्र वैद्यकीय मदत कक्ष!

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१७ फेब्रुवारी :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील अंतर्गत वादाचा आणखी एक नवा अंक पहावयास मिळाला आहे. गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्यासाठी कार्यरत असलेल्या वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे धर्तीवर उपमुख्यमंत्री शिंदेही वैद्यकीय कक्ष कार्यान्वित करत आहेत.

शिंदे यांच्या स्वहस्ते ४ मार्चला उपमुख्यमंत्री सहाय्यक वैद्यकीय कक्षाचे उद्घाटन होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने एक वैद्यकीय कक्ष यापूर्वीच सुरू आहे, मात्र आता शिंदे यांच्या प्रवेशानंतर दोन वैद्यकीय कक्ष सुरू होणार आहेत. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या वैद्यकीय मदत कक्षाला टक्कर देणारा नवा वैद्यकीय फॉर्म्युला आता शिंदे यांनी अंगिकारला असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. किंबहुना फडणवीसांशी स्पर्धा करण्यासाठी शिंदे यांनी हे सूत्र स्वीकारले की काय? असा प्रश्नही विचारला जाऊ लागला आहे.

शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना ५१ हजार रुग्णांना ४१९ कोटी दिले होते. उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ते रुग्णांच्या मदतीसाठी हा कक्ष सुरू करत आहेत. शिंदे यांचे ४ मार्चपासून वैद्यकीय सत्र सुरू होत आहे. मंत्रालयाच्या पहिल्या मजल्यावर हा कक्ष सुरू होणार आहे. त्याचप्रमाणे मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावरील मुख्यमंत्र्यांच्या वॉर रूमजवळ, जिथे महाराष्ट्रातील मोठे प्रकल्प आणि महत्त्वाच्या समस्यांवर लक्ष ठेवले जाते. किंबहुना शिंदे यांनी डीसीएम समन्वय समिती कक्ष तयार केला आहे, जेणेकरून ते राज्यातील प्रकल्पांचाही आढावा घेऊ शकतील.

विधानसभा निवडणुकीनंतर महायुती सरकार स्थापन झाल्यापासून शिंदे आणि फडणवीस यांच्यातील शीतयुद्ध लपून राहिलेले नाही, शिंदेंना पुन्हा मुख्यमंत्री होण्याची आशा होती, मात्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडली . मंत्रिमंडळातील खातेवाटप पासून ते पालकमंत्री पदाबाबत दोन्ही पक्षांत एकवाक्यता नसल्याचे पुढे आले आहे.

नुकतेच शिंदे यांना आपत्ती व्यवस्थापन समितीत स्थान देण्यात आले नव्हते, मात्र त्यांच्या नाराजीनंतर नवीन नियम बनवून समावेश करण्यात आला. तसेच रायगड व नाशिक जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाचा वाद अद्यापही मिटलेला नाही. शिंदे शिवसेनेचे नेते आणि त्यांचे समर्थक सरकारमध्ये सर्व काही ठीक आहे, असे जाहीरपणे सांगत असले तरी अंतर्गत असंतोषाच्या बातम्या सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे शिंदेंची नाराजी शमवण्यात भाजपला यश न आल्याचे बोलले जात आहे.

# पंतप्रधानांच्या हस्ते होणार सोल लीडरशिपचे उद्घाटन

SOUL SCHOOL OF ULTIMATE LEADERSHIP | LEADERSHIP CONCLAVE 2025

मुंबई (वार्ताहर) : 'नेतृत्व' या संकल्पनेवरील चर्चा आणि विचारांमध्ये एक नवा अध्याय सुरू करत स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिपची सोल लीडरशिप परिषदेची पहिली आवृत्ती २१ आणि २२ फेब्रुवारी २०२५ भारत मंडपम, नवी दिल्लीमध्ये सुरू होत आहे. या दोन दिवसांमध्ये राजकारण, क्रीडा, कला आणि प्रसिद्धीमाध्यमे, आध्यात्मिक जग, सार्वजनिक धोरण, व्यापार आणि सामाजिक क्षेत्रातील नेते आपल्या नेतृत्वापर्यंतच्या वैयक्तिक प्रवासाविषयी बोलण्यासाठी, माहितीपूर्ण, सार्थक चर्चांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विचारवंतांच्या नवीन पिढीला प्रेरित करण्यासाठी परिवर्तनकारी नेतृत्वाचे अनुभव इतरांसमोर मांडण्यासाठी एकत्र येणार आहेत.

सोल लीडरशिप परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येईल. यावेळी ते स्कूल ऑफ अल्टीमेट लीडरशिपची औपचारिक घोषणा देखील करतील. हे एक प्रमुख, खाजगी वित्तपुरवठ्यावर चालवले जाणार असलेले नेतृत्व संस्थान आहे. समान विचारधारा असलेल्या व्यक्तींनी याची स्थापना केली आहे. यामध्ये एमिरेट्स, टोरेंट ग्रुपचे अध्यक्ष सुधीर मेहता, एचडीएफसी लिमिटेडचे माजी अध्यक्ष दीपक पारेख, सन फार्मास्युटिकल्सचे एमडी दिलीप संघवी, झायडस लाईफसायन्सेस लिमिटेडचे अध्यक्ष पंकज पटेल, जेएसडब्ल्यू ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदल, आणि कोटक महिंद्रा बँकेचे नॉन-एक्झिक्युटिव्ह संचालक उदय कोटक यांचा समावेश आहे. सोल लीडरशिप परिषदेचे उद्घाटन 'नेतृत्वाकडे' पाहण्याच्या आणि त्याविषयी चर्चा करण्याच्या पद्धतीला आकार देणारा एक ऐतिहासिक कार्यक्रम ठरेल.

उज्वल व अधिक समावेशी भविष्यासाठी उद्देश

या दोन दिवसांमध्ये दिग्गज नेत्यांमध्ये नेतृत्वाविषयी चर्चा आणि माहितीपूर्ण सत्रे होतील, जे त्यांचे यशापयशाचे व्यक्तिगत अनुभव सर्वांसमोर मांडतील. आवड जागवणे, पारंपरिक समजुतींना आव्हान देणे आणि नेत्यांच्या पुढील पिढीला साहसी विचार करण्यासाठी सक्षम करणे व अधिक उज्वल व अधिक समावेशी भविष्यासाठी एक उद्देश घेऊन काम करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

# अजित पवारांची तब्बेत बिघडली, सर्व कार्यक्रम रद्द!

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार रविवारी नाशिक दौऱ्यावर होते. दरम्यान त्यांची प्रकृती अचानक खराब झाली. त्यानंतर दौरा मध्येच सोडून नाशिकमधील सर्व कार्यक्रम रद्द केले आणि ते ओझरवरून पुण्याला रवाना झाले. पवारांच्या प्रकृतीत काहीच सुधारणा झाली नाही. त्यांना बरं वाटत नसल्याने त्यांनी आजचेही सर्व कार्यक्रम रद्द केले आहे आणि सोमवारी सकाळी मुंबईला रवाना झाले. रविवारी नाशिकमध्ये केलेल्या भाषणात पवार यांनी आपली प्रकृती ठीक नसल्याचं सांगितलं होतं. आताच आपण दोन गोळ्या घेतल्या आहेत, तरीही मला बरं वाटत नाही. मी जास्त बोलणार नाही, असं पवारांनी सांगितलं होतं. त्यानंतर त्यांनी नाशिकमधील सर्व कार्यक्रम रद्द करत पुण्याला आले होते. मात्र रात्री उपचार घेतल्यानंतरही त्यांना अजून बरं वाटत नव्हतं. त्यामुळे त्यांनी आजचे सर्व कार्यक्रम रद्द केले आहेत. यानंतर ते मुंबईला रवाना झाले आहे.

# महापालिका कर्मचाऱ्यांना मिळणार साडेदहा लाखांमध्ये हक्काचे घर

मुंबई (खास प्रतिनिधी) : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून अर्थात एमएमआरडीएकून बांधून मिळालेल्या माहुलमधील सदनिकांमध्ये प्रकल्पबाधित राहायला जात नसल्याने तब्बल १३००० सदनिका रिक्त आहेत. माहुलमधील या सदनिकांमध्ये घुसखोरी होत असल्याने त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न अधून मधून होत असला तरी या रिक्त सदनिकांची देखभाल करणे आता महापालिकेच्या कार्यकक्षेच्या पलीकडे गेले आहे. त्यामुळे या सदनिकांची विक्री करण्याचा निर्णय घेतला असून या सदनिका आता महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना मालकी तत्वावर विकल्या जाणार आहे. या प्रत्येक सदनिकेसाठी सुमारे साडेदहा लाख रुपये अधिक मुद्रांक शुल्क आकारली जाणार आहे. त्यामुळे येत्या आठ ते दहा दिवसांमध्ये याचा अंतिम निर्णय जाहीर केला जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

माहुलगाव येथील जागेत एमएमआरडीएने प्रकल्पबाधितांसाठी इमारती बांधून त्यातील सदनिकांचे हस्तांतरण महापालिकेला केले. त्या ठिकाणी महापालिकेने अनेक विकास प्रकल्प तसेच सेवा सुविधांच्या विकासकामांमधील बाधित तसेच जुन्या मोडकळीस आलेल्या भाडेकरुंचे पुनर्वसन केले; परंतु माहुल येथील ही जागा पर्यावरणाला अनुकूल नसून येथील रासायनिक प्रकल्पांमधून येथील लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात प्रकल्पबाधितांनी न्यायालयात धाव घेतल्यानंतर या प्रकल्पबाधित इमारतींमध्ये पुनर्वसन न करण्याचे निर्देश दिले आहे. त्यामुळे आजही या वसाहतीमधील महापालिकेला हस्तांतरीत झालेल्या सदनिकांपैकी पुनर्वसन झाल्यानंतरही सुमारे १३ हजार या रिक्त आहेत. या रिक्त सदनिकांचे करायचे काय असा प्रश्न महापालिका प्रशासनापुढे निर्माण झाला आहे. या रिक्त सदनिकांमध्ये मोठ्या प्रमाणात घुसखोरी होण्याची दाट शक्यता लक्षात घेता या सदनिकांची विक्री महापालिका कर्मचाऱ्यांनाच करून त्यातून महापालिकेला महसूल वाढवण्याचा विचार पुढे आला आहे.

# अकलूज लावणी स्पर्धेत धाराधिवच्या कालिका कला केंद्राचा राज्यात डंका

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : सहकार महर्षी शंकराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या १०७ व्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय लावणी स्पर्धेत धाराशिव जिल्ह्यातील चोराखळी येथील कालिका ग्रुप पार्टीने रोख ३ लाख रुपये आणि चषक पटकावून कालिका ग्रुपच्या प्रमुख निर्मला जाधव आणि संचाने मराठवाड्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यवत (चौफुला) येथील न्यू अंबिका ग्रुप पार्टी आणि सातारा जिल्ह्यातील वेळे येथील पिंजरा कला केंद्राच्या अर्चना वानवडकर आणि संचालाही प्रथम क्रमांक विभागून देण्यात आला आहे. आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी स्वरुपाराणी मोहिते आणि जयसिंह मोहिते पाटील उर्फ बाळादादा यांची प्रमुख उपस्थिती होती.



### स्पर्धेतून प्रोत्साह मिळते



आमच्या अथक परिश्रमाला फळ मिळाले. पारंपरिक लावणी ही आपल्या संस्कृतीची ओळख असून, लावणी स्पर्धेचे संयोजक स्वरुपाराणी मोहिते आणि जयसिंह मोहिते उर्फ बाळदादा यांच्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्राची लावणी कला सातासमुद्रापार गेली असून, मराठी आणि हिंदी चित्रपटातही अनेक लावणीसम्राज्ञींनी नावलौकिक मिळविला आहे. ही स्पर्धा सातत्याने पुढे चालू ठेवल्यास आमच्या सारख्या कलावंतांना बळ मिळेल.

– निर्मला जाधव, पार्टीप्रमुख.

अनिता आष्टीकर, काजल काळे, परवीन शेख, दर्शना वाघमारे, सोनाली गाडेकर, नेहा जाधव, श्वेता अवचार, निकिता खंडागळे, साक्षी कचरे, निकिता मिसाळ, तसलिम शेख, रेखा शिंदे, नितेश जावळे, रणजित लाखे, भानुदास घोसले, विक्की जावळे, राजेंद्र उप्पलवार, गौतम आवाड, लक्ष्मण गंगावणे यांचा संचात समावेश होता.

१ आणि २ फेब्रुवारी २०२५ असे दोन दिवस अकलूजमधील स्मृती भवन, शंकर नगर येथे घेण्यात आलेल्या लावणी स्पर्धे चे हे २८ वे वर्ष होते. १९९३ पासून ही लावणी स्पर्धा घेण्यात येते. यंदाच्या स्पर्धेत १० संघ सहभागी झाले होते. कालिका ग्रुपच्या निर्मला जाधव यांच्यासह दहा नृत्यांगणा, गायिका प्राजक्ता महामुनी आणि नृत्य दिग्दर्शक महेंद्र बनसोडे यांचा यात समावेश होता.

# महाकुंभात ५१ कोटींहून अधिक भाविकांचे पवित्र स्नान

प्रयागराज (वृत्तसंस्था): उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील त्रिवेणी संगमावर महाकुंभमेळा सुरू आहे. १३ जानेवारीपासून या महाकुंभ मेळ्याला प्रारंभ झाला. तेव्हापासून शनिवार,१५ फेब्रुवारीपर्यंत ५१.४७ कोटींहून अधिक लोकांनी पवित्र स्नान केले, या संदर्भातील माहिती उत्तर प्रदेश सरकारच्या माहिती आणि जनसंपर्क विभागाने दिल्याचे वृत्तसंस्थेने दिले आहे.

आज १.१८ कोटी भाविकांचे पवित्र स्नान उ. प्रदेश सरकारच्या माहिती विभागानुसार, रविवार १६ फेब्रुवारीला दुपारपर्यंत १.१८ कोटी भाविकांनी त्रिवेणी संगमानात पवित्र स्थान केल्याचे देखील सांगितले. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील गंगा, यमुना आणि गुप्त सरस्वती अशा पवित्र नद्यांच्या त्रिवेणी संगमावर महाकुंभमेळा सुरू आहे. १४४ वर्षांनी विशेष असलेल्या या महाकुंभमेळ्याला देश-विदेशातील अनेक भाविक संगमस्नानासाठी व कल्पवासासाठी प्रयागराजमध्ये दाखल होत आहेत.

४५ दिवसांचा महाकुंभमेळा

उ. प्रदेशातील प्रयागराजमध्ये महाकुंभमेळा दर १२ वर्षांनी होतो. याआधीचा कुंभमेळा २०१३मध्ये झाला होता. त्यानंतर २०१९मध्ये अर्धकुंभमेळा झाला. तो दर ६ वर्षांनी होतो. आता तब्बल १२ वर्षांनंतर प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या ४५ दिवसांच्या महाकुंभ मेळ्यास त्रिवेणी संगमावर पवित्र स्नानासाठी लाखो भाविक येत आहेत.




राज्यसभा प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांचे प्रतिपादन; वैद्य खडीवाले संस्थेच्या पुरस्कारांचे वितरण

# पारंपरिक ज्ञानशाखांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न व्हावेत

### वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार' प्रदान

पुणे : आपल्या पारंपरिक ज्ञानशाखांच्या पुनरुज्जीवनासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी पुढाकार घेऊन जागतिक पातळीवर त्याचे मार्केटिंग केले पाहिजे, असे प्रतिपादन राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारकडून आयुर्वेदाला लोकाभिमुख करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते रविवारी झाले. एरंडवण्यातील धन्वंतरी सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात सोलापूर येथील वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वैद्य विनायक प. खडीवाले, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष वैद्य स. प्र. सरदेशमुख, सचिव वैद्य योगेश व. गोडबोले, विश्वस्त वैद्य संगीता खडीवाले, विश्वस्त वैद्य निखिल खडीवाले, विश्वस्त वैद्य विवेक




साने, विश्वस्त जयश्री टाव्हरे आदी उपस्थित होते.

समारंभात वैद्य पुरुषोत्तम शास्त्री नानल चरक पुरस्कार पुण्यातील वैद्य गुणवंत येवला, वैद्य द. वा. शेंडे रसौषधी पुरस्कार पुण्यातील वैद्या विशाखा बाक्रे, वैद्य वि. म. गोगटे वनौषधी पुरस्कार नाशिकच्या वैद्य अर्चना भास्करवार, वैद्य आचार्य यादवजी त्रिकमजी ग्रंथ पुरस्कार सांगलीतील वैद्य अनिरुध्द कुलकर्णी व वैद्य अमृता जोशी, वैद्य बाळशास्त्री लावगनकर पंचकर्म पुरस्कार नागपूरच्या वैद्य सचिन चंडालिया, वैद्य बापूराव पटवर्धन सुश्रुत पुरस्कार वर्ध्यातील वैद्य शीतल आसुटकर, वैद्य भा. गो. घाणेकर अध्यापन पुरस्कार गोव्यातील वैद्या अरुणा बाले, वैद्य मा. वा. कोल्हटकर संशोधन पुरस्कार मुंबईतील वैद्या कल्पना धुरी, वैद्या लक्ष्मीबाई बोरवणकर स्त्री वैद्या पुरस्कार पुण्यातील वैद्या हेमलता जळगावकर, वैद्य शंकर दाजीशास्त्री पदे कार्यकर्ता पुरस्कार पुण्यातील वैद्य मनिष जोशी, पूज्य पादाचार्य रचनात्मक कार्य पुरस्कार पुण्यातील वैद्य जय ताम्हाणे व डॉ. वा. द.वर्तक वनमित्र पुरस्कार रघुनाथ ढोले यांना प्रदान करण्यात आला. २१ हजार रोख रक्कम व मानपत्र देऊन या वैद्यांना सन्मानित करण्यात आले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, आयुर्वेदाला आता चांगले दिवस आले आहेत. इतकी वर्षे आपल्या पारंपरिक ज्ञानशाखांकडे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे प्राचीन संशोधन, प्रयोग जे अनुभवांतून सिद्ध झाले होते, तेही मागे पडले. त्यांना वाव मिळाला नाही. आता मात्र परिस्थिती अनुकूल आहे. त्यामुळे आयुर्वेद तज्ञांनी अन्य पॅथींसह कुठे सहकार्य करणे शक्य आहे, याचा विचार करावा. परस्परांसह चर्चा, संवाद साधावा. ज्याद्वारे पारंपरिक ज्ञानशाखांचे आधुनिक काळातील पुनरुज्जीवन शक्य होईल.

वैद्य प्रशांत बागेवाडीकर म्हणाले, आज आयुर्वेदाला कधी नव्हता इतका अनुकूल काळ दिसत आहे. आयुर्वेदासाठी आपल्या आधीच्या पिढ्यांनी अतोनात संघर्ष आणि परिश्रम घेतले आहेत. त्यांचे ऋण मान्य केले पाहिजे. आयुर्वेदिक रसशास्त्रातील औषधे वापरू नका, हा अपप्रचार थांबवला पाहिजे. आपल्या ज्ञानाचा प्रसार, प्रचार करण्याची जबाबदारी आपलीच आहे. त्यातूनच आयुर्वेद जागतिक स्तरावर जाईल.

प्रास्ताविकात वैद्य विनायक खडीवाले म्हणाले, पुरस्काराचे हे ४० वे वर्ष आहे. आयुर्वेद क्षेत्रात जे समाजासाठी चांगले, सकारात्मक कार्य करीत आहेत, त्यांचे कौतुक, त्यांच्या कार्याची माहिती इतरांपर्यंत पोहोचावी आणि त्यांच्या कार्यापासून इतरांना प्रेरणा मिळावी, या हेतूने वैद्य दादा खडीवाले यांनी याची सुरुवात केली. पुरस्कारप्राप्त सर्व वैद्यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते श्रीकृष्ण चितळे यांचा अमृत महोत्सवानिमित्त सत्कार करण्यात आला. वैद्य संगीता खडीवाले यांनी सूत्रसंचालन केले. वैद्य विवेक साने यांनी आभार मानले.



Made with Xodo PDF Reader and Editor



# शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने शिवछत्रपती आदर्श गौरव पुरस्काराची घोषणा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवछत्रपती जयंती समिती तर्फे दिले जाणारे शिवछत्रपती आदर्श गौरव पुरस्कार १७ फेब्रुवारी रोजी पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आले. पुरस्कार समितीचे अशोक अर्धापुरकर, प्राचार्य पवन सोळंके -वसेकर पत्रकार राजेश दारव्हेकर यांनी पाच पुरस्कार प्राप्त मान्यवरांची नावे जाहीर केली.

कृषी क्षेत्रासाठी दिला जाणारा पुरस्कार सोपानराव रामराव शिंदे, पांगरा शिंदे. यांना जाहीर करण्यात आला. शिंदे यांनी बारावीपर्यंत शिक्षण, अल्पभूधारक, फळबाग कुकूटपालन शेळीपालन असे शेतीपूरक व्यवसाय हे करतात. अल्पभूधारक असल्याने रेशीम शेती हा व्यवसाय त्यांनी निवडला व त्यात विशेष प्रगती करून भरघोस उत्पन्न घेतले. रेशीम शेतीमध्ये विशेष प्राविण्य मिळवून १५० पेक्षा जास्त प्रशिक्षण त्यांनी आतापर्यंत दिले. शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे ही त्यांची आवड. नगदी पिकाकडे शेतकऱ्यांनी वळावे यासाठी त्यांनी रेशीम शेती सर्व दूर पोहोचवली. शेतकऱ्यांच्या सामुहिक सहली आयोजित करणे, समूह शेतीला चालना देणे, प्रत्यक्ष शेतात जाऊन बांधावर माहिती देणे, वर्तमानपत्र व मासिकातून त्यांचे लेखही प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुरस्काराबरोबर आजपर्यंत बारा पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे.

साहित्य क्षेत्रातला मानाचा पुरस्कार गणेश प्रल्हादराव आघाव यांना जाहीर करण्यात आला. त्यांचे दोन कवितासंग्रह एक बालकविता संग्रह एक कथासंग्रह प्रसिद्ध आहे. पोरी शाळेत निघाल्या की ही कविता ३२ आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये भाषांतरित झाली. सर्व प्रमुख भारतीय भाषण मध्ये ही कविता अनुवादित झाली. मातीच्या कविता हा उर्दूमध्ये अनुवाद. बालभारती पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळावर सदस्य. त्यांना विविध पुरस्काराने सन्मानित केलेले आहे. पोरी शाळेत निघाल्या ही कविता जपानी भाषेत अनुवादित झाली असून तिथे जपानच्या पाठ्यपुस्तकात अभ्यासाला आहे.

शिक्षण क्षेत्रासाठी दिला जाणारा मानाचा पुरस्कार देविदास दत्तात्रय गुंजकर यांना जाहीर करण्यात आला. ते प्राथमिक शिक्षक आहेत. कोरोना काळात शिक्षक आपल्या दारी हा उपक्रम विशेष उल्लेखनीय होय. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमात जिल्ह्यात पहिली शंभर टक्के प्रगत शाळा म्हणून जीव तरोडा. ६०० च्या वर शिक्षकांना कार्यशाळांना मार्गदर्शन. जिल्ह्या बाहेरही कार्यशाळा घेतल्या. त्यांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. अध्ययन प्रक्रियेचे घटक निर्मिती व भविष्य. शिक्षण तथा अध्ययन प्रक्रिया व्यवस्थापन यांवर त्यांचे कार्य आहे.

लोककला या प्रकारात कुमारी वैष्णवी शामराव धोंगडे मानाचा पुरस्कार जाहीर झाला. इयत्ता अकरावी मध्ये शिकणारी ही मुलगी असून संबळ हे वाद्य अतिशय उत्कृष्ट वाजवतो. लोककला माध्यमातून पारंपारिक गोंधळ या प्रकारात नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा दिल्लीचे प्रतिनिधित्व तिने केले. त्रिपुरा आगरताळा येथे अखिल भारतीय लोककला महोत्सवातून पर राज्यात गोंधळ प्रकारातील संबळ वादन करून महाराष्ट्राची परंपरा प्रदर्शित केली. दिल्ली व उज्जैन येथे गोंधळाचे सादरीकरण केले. एबीपी माझा स्टुडिओमध्ये तिने संबळ वाद्य वाजवले.

समाजसेवा या क्षेत्रासाठी दिला जाणारा मानाचा पुरस्कार गिरीश गुंडेवार हिंगोली यांना जाहीर झाला. गॅलेक्सी सेवाभावी संस्थेची स्थापना त्यांनी केली व त्याचे ते अध्यक्ष आहेत. त्या माध्यमातून आजपर्यंत पाच हजार रक्त पिशव्यांचे संकलन केले. रक्तदानाचे महत्त्व पटवून देणे रक्त रक्तदानासाठी जनतेला आवाहन करणे अशी कामे त्यांनी केली. रक्तदान संकलित करून रक्तदानाची उणीव त्यांनी भरून काढली. वेळोवेळी गरजू लोकांना मदत करतात. ते किराणा दुकानदार चालक असून वेळात वेळ काढून समाजकार्य करतात. रक्तदानाबरोबरच अवयव दान यासाठी सुद्धा त्यांनी विशेष काम केले. अवयव दाना मधील नेत्रदान याची जनजागृती करून मित्र दिनासाठी लोकांना परावर्तित केले. आजपर्यंत २५ नेत्रदान त्यांनी यशस्वीरित्या लोकांना परावर्तित करून करून घेतले.

# हास्यातून वाईटावर डॉ बेग यांचा प्रहार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

येथे सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शिवजयंती महोत्सवानिमित्त दि १६ फेब्रुवारी रविवार रोजी हास्य सम्राट डॉ.मिर्झा बेग यांच्या यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ मिर्झा बेग यांनी आपल्या वऱ्हाडी स्टाईल विनोदातून वाईट परंपरा वर प्रहार करीत उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरामध्ये आयोजित कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी मनोज आखरे, त्र्यंबक लोंढे, भुषण देशमुख, समिती मार्गदर्शक कल्याण देशमुख सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष ॲड उल्हास पाटील यांच्यासह समितीचे सागर डांगे, ॲड दिलीप भाकरे, प्रकाश इंगोले, शुभम बहिरे, ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पन करून पूजन करण्यात आले.

त्यानंतर तब्बल अडीच तास चाललेल्या या कार्यक्रमातून डॉ मिर्झा बेग यांनी आपल्या विनोदी शैलीतून समाजात रूढ झालेल्या विविध चालीरीती व परंपरावर हास्यातून प्रहार केला. त्यामध्ये मराठी भाषेवरील कमी होत चाललेले प्रेम व वाढलेली इंग्रजी भाषेचे फॅड यावर त्यांनी विनोदातून टीका केली. उपस्थित प्रेक्षकांना मायबोली भाषा टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. याप्रसंगी त्यांनी वाढती महागाई, पडलेले शेतीमालाचे भाव तसेच परिवारातील कलह नवरा बायकोचे भांडण वाढीस लागलेली जातीयता व समाजात विष पेरण्याचे काम, यावर सडाडून टीका केली, शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांनाही काव्यातून आदरांजली अर्पण केली. येथील समितीमध्ये विविध जाती धर्माचे पदाधिकारी काम करीत असून महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी माझ्यासारख्या कलाकाराला या ठिकाणी बोलावले यातुन महोत्सव समिती खऱ्या अर्थाने शिवाजी महाराजांचा एकात्मतेचा संदेश समाजात रुजवत असल्याचेही ते म्हणाले.

# परिवहन विभागाचे हेल्मेट युक्त, अपघात मुक्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

जिल्ह्यात रस्ते अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने हेल्मेट मुक्त हिंगोली अपघात मुक्त हिंगोली उपक्रम राबविण्यात येत आहे. विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्यांवर तसेच वाहन चालवितांना हेड फोनचा किंवा मोबाईलचा वापर करणाऱ्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

हिंगोली जिल्ह्यात मागील तीन महिन्यात रस्ते अपघातांची संख्या ४० पेक्षा अधिक आहे. यामध्ये भरधाव वेगाने वाहन चालविणे, मोबाईलवर बोलतांना वाहन चालविल्यामुळेच अपघात झाल्याचे दिसून आले आहे. विशेषत: दुचाकी वाहन चालक विना हेल्मेट वाहन चालवित असल्यामुळे डोक्याला गभीर दुखापतीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे रस्ता सुरक्षा अभियानात प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आश्विनी स्वमी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये मोटार वाहन निरीक्षक जगदीश माने नलीनी काळपांडे, शैलेश कोपुल्ला, आशिष तडवी यांनी मोठ्या गावांमधून तसेच शहरांमधुन कार्यक्रम धेऊन वाहतुक नियमांचे महत्व पटवून दिले आहे. यासाठी विविध शाळा, महाविद्यालयात मार्गदर्शन करण्यात आले तसेच सुरक्षा सप्ताहानिमित्त ठिकठिकाणी रॅली काढण्यात आली तसेच शिक्षकांची देखील मोठी रॅली काढण्यात आली होती.

मार्गदर्शन करीत असतांना वाहतुकीचे नियम न पाळल्यास एखाद्याला अपघातात डोक्याला झालेली दुखापत बरी होण्यासाठी जास्त कालावधी लागतो त्यामुळे अपघातातील रूग्ण व नातेवाईकांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागतो त्यामुळे वाहतुक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यालयाच्यावतीने हेल्मेट युक्त हिंगोलीअपघात मुक्त हिंगोली हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यामध्ये आता विना हेल्मेट वाहन चालविणाऱ्यांवर तसेच वाहन चालवितांना मोबाईल, हेडफोन चा वापर करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. त्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली जाणार असल्याचे उपप्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

तसेच चारचाकी वाहन चालकांनी सीटबेल्टचा वापर करावा, तसेच वाहन चालकांनी नियमांचे पालन करून मर्यादीत वेगातच वाहन चालविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**हिंगोली– येथील शासकीय विश्रामगृह परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळा तसेच परिसराची पाहणी आणि दि २२ फेब्रुवारीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संभाव्य दौऱ्यानिमित्त सोमवारी जिल्हाधिकारी अभिनव गोयल आणि पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पाहणी केली. तसेच शिवजन्मोत्सवानिमित्त सुरू असलेल्या कार्यक्रमांचा आढावा घेतला. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### साई नगर श्री संत सेवालाल जयंती साजरी



वसमत- येथील बंजारा बांधवांनी साईनगरमध्ये संत सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रकाश पवार हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आमदार राजूभैया नवघरे यांची उपस्थिती होती यावेळी विजय जाधव व रमेश जाधव यांनी श्री संत सेवालाल महाराज यांच्या जीवन चरित्रावर आणि शिकवणीवर प्रकाश टाकला. जयंतीच्या या कार्यक्रम प्रसंगी बंजारा समाजाच्या वतीने आमदार राजूभैया नवघरे यांचा सत्कार करण्यात आला. कै. माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक साहेबांच्या पुतळ्याच्या नियोजित जागेसंबंधीचा प्रश्न सोडवा्वा अशी मागणी आ नवघरे यांचेकडे बंजारा बांधवांकडून करण्यात आली. बंजारा पारंपारिक नृत्य सादर केले. यानंतर भव्य महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम प्रसंगी विठ्ठल केशव जाधव, आदित्य आहेर, संतोष चव्हाण, तानाजी आडे, गणेश चव्हाण, वैभव चव्हाण, आनंद राठोड, सुंदर सिंग जाधव, निलेश जाधव, सुदाम जाधव, संतोष राठोड, आतिश जाधव, अनिल राठोड, संस्कार राठोड, हिरामण चव्हाण, सुनील जाधव, अशोक जाधव, साहेबराव राठोड गुलाब राठोड, संतोष रामभाऊ चव्हाण हे उपस्थित होते. जयंती साजरी करण्यासाठी कॉलनीतील सर्व नागरिकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रमोद पवार यांनी केले तर आभार अविनाश पवार यांनी मानले.

### शिवजयंतीनिमित्त तेलगावात क्रिकेट सामने

वसमत- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निम्मित क्रिकेट क्लब तेलगाव च्या वतीने खुले क्रिकेट सामने याचे आयोजन दिनांक १९ फेब्रुवारी रोजी आयोजन केले आहे. उदघाटक म्हणून कोनाथा सरपंच राजरत्न सुभाषराव कुंटे यांना आमंत्रीत केले आहे त्याच बरोबर शिवराज गणेश मंडळ पदाधिकारी, गावचे सरपंच श्री बाळु गिरी तसेच प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत. सामन्याचे प्रथम बक्षीस २१००० कोनाथा सरपंच राजरतन सुभाषराव कुंटे मार्फत देण्यात येणार असून, द्वितीय ११११९ शिवराज गणेश मंडळ, तृतीय ७०७७ क्रिकेट क्लब तेलगाव वतीने देण्यात येणार आहे, विशेष विविध बक्षीस देखील समावेश आहे. तरिही क्रिकेट प्रेमींनी आपला संघाची नोंद करून सहभाग घ्यावाअसे आवाहन केशव राऊत, ज्ञानेश्वर कानोडे, गोविंद, रुपेश, रामेश्वर, शिवराज, शुभम आदींनी केले आहे.

# पवार पब्लीक स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

पवार पब्लिक स्कूल येथील इयत्ता दहावी या वर्गातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या थाटात झाला याप्रसंगी विविध विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्या शालेय जीवनातील अनुभव कसे होते व ते पुढे महाविद्यालयीन आयुष्यात काय करणार आहे यावरही त्यांचे मत व्यक्त झाली त्यानंतर शाळेचे सर्वेसर्वा प्रणव पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर विद्यार्थ्यांचे विशिष्ट गेम्स घेऊन त्यांना प्रवृत्त केले व त्यानंतर स्नेह भोजनाचा प्रोग्राम झाला याप्रसंगी उपस्थित शाळेचे संचालक प्रणव शिवाजीराव पवार, ज्ञानेश्वर राजने, प्रसाद कदम, गजानन गायकवाड, वैशाली खानापुरे, सचिन धामणे, कोमल अग्रवाल, गजानन वानरे, केसी सोली, दिपाली राऊत, सय्यद फिजा, रसिका विडोळकर, चैताली विच्चेवार, अश्विनी सराफ, छाया धनवे, जॉर्ज जोबिन, पंकज इंगोले, योगेश थोरात, सचिन इंगोले, विकास महानूर, वैभव काळे आदी उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सवानिमित्त तीन दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव अंतर्गत तीन दिवसीय सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आले असून सांस्कृतिक स्पर्धेची उद्घाटन माजी आ. गजानन घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील कार्याध्यक्ष बिरजू यादव, सचिव सागर डांगे, मार्गदर्शक कल्याण देशमुख, प्रकाश इंगोले, बालाजी वानखेडे, ज्ञानेश्वर चव्हाण, दिलीप भाकरे,शिवराज सरनाईक, लोखंडे, आदींची प्रमुख उपस्थीत होते. पहिल्या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारचे वैयक्तिक व सामूहिक नृत्य सादर करण्यात आले. लहान मुलं-मुली विविध प्रकारच्या आकर्षक वेशभूषा, पोशाखा परिधान करून अतिशय सुरेख नृत्य सादर करून उपस्थितांचे मने जिंकून घेतले. सौ.शिल्पा नर्सीकर, राजू लोखंडे, सागर चौधरी, संतोष दिपके, निकिता खिल्लारे, प्रणिता कौलवार, आदींनी परिश्रम घेतले. सदरील सांस्कृतिक कार्यक्रम तीन दिवस आयोजित करण्यात आले असून यामध्ये मोठ्या संख्येने सामुहीक, वैयक्तिक नृत्य तसेच विविध नाटीका, वेशभूषा सादर करण्यात येत आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी होत आहेत.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये संत सेवालाल महाराज जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ फेब्रुवारी**



सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथील शाळेत सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्यासुरुवातीला शाळेचे संचालक सुनील राठोड यांच्या हस्ते सेवालाल महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर चिमुकल्या मुलांनी सेवालाल महाराजांचे कार्य आणि जीवन यावर आपले मनोगत व्यक्त केले. या विद्यार्थ्यांमध्ये स्वरा ढवळे, श्रेया पांढरे, श्रावणी कदम, प्रियांस पवार, तनिष्का आडे यांनी सेवालाल महाराजांचे जीवन आणि कार्य यावर प्रभावीपणे आपले विचार मांडले. त्यानंतर मुलींनी नृत्याचे सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील राठोड यांनी आपल्या भाषणातून बोलत असताना असे म्हणाले की, गोर बंजारा समाजाला आपल्या वाणी आणि कार्यातून सत्याच्या मार्गाकडे नेण्याचे कार्य सेवालाल महाराजांनी केले. ते खरोखरच थोर साधुपुरुष आहेत. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी सेवालाल महाराजांच्या महान कार्याचे स्मरण केले आणि त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला या कार्यक्रमाला संचालक सुनील राठोड, सौ पुष्पा सुनील राठोड श्री विपुल राठोड सर सौ रेशमा विपुल राठोड शाळेचे सहसंचालक मुकुल राठोड शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रित कौर प्रशासक मारुती मेकाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले.

# बसमध्ये जागा मिळवण्यासाठी मुलांचा जीव धोक्यात



**हिंगोली, १७ फेब्रुवारी**

येथील बसस्थानकात दिवसेंदिवस प्रवाशांची गर्दी वाढत असून जागा मिळविण्यासाठी प्रवाशी लहान मुलांना खिडकीतून बसमध्ये जीव धोक्यात घालून बसवित असतांना दिसत आहेत.

सध्या लग्नसराईचे दिवस तसेच दहावी बारावीच्या परीक्षा असल्यामुळे तसेच एस टी महामंडळाने महिलांसाठी अर्धे तर ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत सेवा सुरू केल्यामुळे येथील बस स्थानकात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहे. त्याप्रमाणात बसेसची संख्या नसल्याने बस मध्ये जागात मिळविण्यासाठी प्रवाशी छोट्या मुलांना खिडकीतून जीव धोक्यात टाकून बसमध्ये सोडतांना दिसत आहेत. याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



## अग्रलेख...

# अर्थसंकल्पोत्तर अर्थचित्र

संपूर्ण देशाचे आर्थिक गणित, आवक-जावक आणि अर्थभार सादर करणारा केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर होऊन काही दिवस उलटले असले, तरी त्याचे कवित्व आणखी काही दिवस सुरू राहील. याचे कारण केंद्रीय अर्थमंत्र्यांनी जाहीर केलेल्या आकड्यांचे, विविध योजनांसाठी देऊ केलेल्या रकमेचे त्या त्या क्षेत्रावर नेमके कसे आणि कोणते परिणाम दिसतील, याचे अवलोकन नंतरच्या दिवसांमध्येच होते. तज्ज्ञ आपल्या चिकित्सक नजरेने त्याचे अर्थ लावून निष्कर्ष नोंदवतात आणि खरे अर्थचित्र सर्वसामान्य जनतेसमोर मांडतात. त्यातून आर्थिक तरतुदींचे नेमके स्वरूप समोर येते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन्? यांनी सादर केलेल्या २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात भारताच्या उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी अनेक तरतुदी असल्याचे एव्हाना स्पष्टपणे समोर आले आहे. हे उपाय येत्या काळात औद्योगिक क्षमता वाढविण्यासाठी, गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी पूरक ठरणार असून भारताला जागतिक उत्पादन केंद्र बनविण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहेत. नवोपक्रमाला चालना देण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात काही विशेष तरतुदींचा समावेश आहे. त्यातील एक म्हणजे संशोधन आणि विकास अनुदान. याअंतर्गत उदयोन्मुख संशोधन उपक्रमांना समर्थन देण्यासाठी निधीची स्थापना करण्यात आल्याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळेच येत्या काळात असे उपक्रम गतिमान झालेले दिसू शकतात. दुसरे म्हणजे शैक्षणिक संस्थांशी सहकार्यांतर्गत नवोपक्रमाला चालना देण्यासाठी आणि अत्याधुनिक उत्पादन उपाय विकसित करण्यासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील भागीदारीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. खेरीज, राबविले जाणारे निर्यात प्रोत्साहन उपाय भारतीय उत्पादकांची जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी उपयुक्त सिद्ध होणार आहे. त्यामुळेच अर्थसंकल्पात समाविष्ट असणारा हा भागही विशेष महत्त्वाचा म्हणायला हवा. व्यापार सुविधेचा मुद्दाही लक्षणीय म्हणावा लागेल. कारण व्यवहार खर्च आणि वेळ कमी करण्यासाठी निर्यात प्रक्रियांचे सरलीकरण झाल्यास भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक बनतील. शिवाय, डिजिटलायझेशन आणि ऑटोमेशनला समर्थन देण्याच्या उद्देशाने तसेच आधुनिक उत्पादनात तंत्रज्ञानाचे महत्त्व ओळखून ताज्या अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेले मुद्देही महत्त्वाचे आहेत. जसे की, उत्पादन प्रक्रियेत कार्यक्षमता आणि उत्पादकता सुधारण्यासाठी ऑटोमेशन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्याची भूमिका येत्या काळात वेगळे चित्र समोर आणू शकते. त्याचप्रमाणे स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि इंडस्ट्री ४.० उपक्रमांना पाठिंबा देण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करण्याची मनीषा लक्षणीय ठरू शकते. अर्थसंकल्पात सरकारने काही उत्पादनांना विशेष प्रोत्साहन देणाऱ्या (पीएलआय) योजनांचा विस्तार केला आहे. उदाहरणार्थ, मागील पीएलआय योजनांच्या यशावर आधारित यंदाही कापड, पादत्राणे आणि शाश्वत वस्तू यासारख्या अतिरिक्त क्षेत्रांच्या विस्ताराची घोषणा झालीच आहे. या निर्णयामुळे स्वाभाविकच या उद्योगांमध्ये गुंतवणूक तसेच उत्पादन क्षमता वाढेल. परिणामी आपण भारताची निर्यात स्पर्धात्मकता वाढण्याची अपेक्षा बाळगू शकतो. उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात परिवर्तनात्मक कर सुधारणा सादर केल्या गेल्या. लवकरच त्याचे परिणाम दिसू लागतील. त्यामुळेच नवीन उद्योगांच्या स्थापनेला प्रोत्साहन देण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या उत्पादन युनिट्ससाठी सवलतीचा १५ टक्के हा कर दर पुन्हा सुरू करणे; उत्पादन क्षेत्रातील नवोपक्रमांना उत्तेजन देण्यासाठी संशोधन आणि विकास उपक्रमांवर केंद्रित कर प्रोत्साहन यासारखी धोरणे भारताला जागतिक उत्पादन नवोपक्रम केंद्र म्हणून स्थान देणारी ठरतील. घरगुती वापर वाढविण्यासाठी आणि स्थानिक उत्पादकांना पाठिंबा देण्यासाठी ग्राहकोपयोगी वस्तूंवरील जीएसटी दरांमध्ये कपात करण्याचा प्रयत्नही अनुकूल परिणाम दाखवून जाईल. उत्पादनात पायाभूत सुविधांची महत्त्वाची भूमिका ओळखून केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली आहे. याचाही येत्या काळात सकारात्मक प्रभाव पडताना दिसेल. जसे की, लॉजिस्टिक्स आणि वाहतूक सुकर, वेगवान करण्यासाठी समर्पित फ्रेट कॉरिडॉरचा विकास आणि लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यासाठी आणि पुरवठा साखळी सुधारण्यासाठी प्रादेशिक हवाई कनेक्टिव्हिटी वाढविली जाणार असल्याने या क्षेत्राची कार्यक्षमता वाढल्याचे चित्र समोर येऊ शकते. तसेच देशांतर्गत आणि परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज नवीन औद्योगिक कॉरिडॉरची स्थापना करणार असल्याचे जाहीर झाल्यामुळे विकासाचा नवा वेग बघायला मिळू शकतो. अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना पाठिंबा देणाऱ्या योजना जाहीर केल्या. हे सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योग भारताच्या उत्पादन क्षेत्राचा कणा म्हणता येतील. तेव्हा या उद्योगांना पाठिंबा देण्यासाठी अर्थसंकल्पात सादर केलेल्या उपाययोजना जाणीवपूर्वक नोंद घेण्याजोग्या आहेत. त्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांनी प्रक्रियांचे सरलीकरण करणार असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार एमएसएमईएसवरील नियामक भार कमी झाला आणि अनुपालन प्रक्रिया सुलभ झाली तर व्यवसाय करणे सोपे होईल. त्याचप्रमाणे एमएसएमईएस क्षेत्राला उत्पादन प्रक्रिया सक्षम करण्यासाठी आणि वाढविण्यासाठी, खेरीज जागतिक मूल्य साखळीत समाकलित होण्यास मदत करण्यासाठी कमी व्याजदराने कर्जे आणि वाढीव निधी संधींची केलेली तरतूदही बळ देणारी ठरू शकते. जागतिक पर्यावरणीय वचनबद्धतेनुसार यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारने शाश्वत उत्पादनावर भर दिल्याचे स्पष्ट दिसून येते. त्याचाच एक भाग म्हणजे जाहीर झालेले हरित अनुदान. या अंतर्गत उद्योगांना पर्यावरणपूरक पद्धती आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हरित अनुदाने आणि कर सवलतींचा परिचय करून देण्यात आला आहे. शिवाय, २०७० पर्यंत कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी आणि निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्याच्या उद्देशाने प्रकल्पांना समर्थन देण्यासाठी कमी व्याजदराचे कर्जही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ढासळत्या पर्यावरणाच्या पृष्ठभूमीवर सरकारचा हा पुढाकारही महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. या सगळ्याच्या बरोबरीने केंद्रीय अर्थमंत्र्यांनी उत्पादन क्षेत्रात अधिकाधिक परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अर्थसंकल्पात काही बाबी प्रस्तावित केल्या आहेत. त्यात विम्यासारख्या क्षेत्रात परकीय गुंतवणुकीची अर्थात एफडीआयची मर्यादा १०० टक्क्यांपर्यंत वाढविणे, बाजारपेठेत प्रवेश वाढविणे आणि आंतरराष्ट्रीय कौशल्य आणणे याचा समावेश होतो. त्याचप्रमाणे गुंतवणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी भारतात उत्पादन युनिट स्थापन करू पाहणाऱ्या परदेशी गुंतवणूकदारांना मंजुरी प्रक्रिया आता सुलभ झाली आहे. स्वाभाविकच येत्या काळात त्याचे सकारात्मक परिणाम बघायला मिळतील. सरकारने नेहमीच कौशल्य विकासावर भर दिला आहे. गेल्या काही वर्षांचा आढावा घेता यासाठी भरीव निधी दिल्याचे स्पष्ट होते. यातून सरकारचा मोठी रोजगार निर्मिती करण्याचा मानस आहे. हाच धागा पकडून यंदाही सरकारने कुशल कामगारांच्या गरजेनुसार अर्थसंकल्पात काही गोष्टींसाठी संसाधने वाढविणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यात व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमाचा समावेश होतो. अशा प्रकारे रोजगार क्षमता वाढविण्यासाठी उत्पादन क्षेत्राच्या गरजांनुसार कौशल्य विकास कार्यक्रमांचा विस्तार झाला तर अधिक लोक या योजनेमध्ये सामावले जातील आणि रोजगारवाढीला चालना मिळालेली दिसेल. त्याचप्रमाणे जाहीर केल्यानुसार कंपन्यांना अप्रेंटिसशिप कार्यक्रम ऑफर करण्यास प्रोत्साहन दिले गेल्यास नोकरीच्या नवनवीन संधी निर्माण होतील आणि यातून पुढे येणारा कुशल कामगारांचा समूह अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल. एकंदर अर्थसंकल्पामध्ये दिसणारी संशोधन आणि विकासाला समर्थन देण्याची, शैक्षणिक संस्थांबरोबर सहकार्य करून नवोपक्रमाला चालना देण्याची, निर्यातीला प्रोत्साहन देण्याची, व्यापार सुविधा वाढविण्याची केंद्र सरकारची भूमिका देशाचे अर्थचित्र सुंदर रंगात रंगवू शकेल, अशी आशा करायला हरकत नाही.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# आप पंजाबही गमावणार!

राजधानी दिल्लीची सत्ता गमावल्यानंतर आम आदमी पक्ष पंजाबमधील पुढील निवडणुकीत राज्याची सत्ता गमावणार आहे. दिल्लीत आम आदमी पक्षाने काही क्षेत्रांत म्हणजे शिक्षण, आरोग्य यावर काही काम तरी केले होते, पंजाबमध्ये मात्र साराच दुष्काळ आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल हे स्वत: सनदी अधिकारी असल्याने सरकारचे कामकाज कसे चालते, याचा त्यांना पुरेपूर अनुभव होता. त्याचा फायदा त्यांनी दिल्लीत करून घेतला. पण दिल्ली सरकारच्या अपुऱ्या अधिकारांमुळे त्यांना फार कामगिरी करता आली नाही, असे त्यांच्या समर्थकांना वाटते. पंजाबमधील स्थिती वेगळी आहे.

**मद्यपी मुख्यमंत्री :** दिल्लीत आम आदमी पक्षाची वाताहत दिल्ली सरकारच्या मद्य धोरणामुळे झाली, असे मानले जाते तर पंजाबमध्ये आम आदमी पक्षाची वाताहत मद्यपी मुख्यमंत्र्यामुळे होणार आहे. आम आदमी पक्षात तरी हे बोलले जाते. मुख्यमंत्री भगवंत मान यांनी सत्तेवर येताच पहिले काम केले ते स्वत:चा दुसरा विवाह करण्याचे. मग त्यांनी एका अपत्यास जन्म दिला आणि मग आपल्या नव्या पत्नीस कडेकोट सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला. भगवंत मान आपल्या सरकारकडे-पक्षाकडे लक्ष देण्याऐवजी नव्या संसारातच रममाण झाले आणि आपला याचा पहिला फटका बसला तो लोकसभा निवडणुकीत.

**पहिला फटका :** विधानसभा निवडणुकीत राज्यात विक्रमी बहुमत मिळविणाऱ्या आम आदमी पक्षाला लोकसभा निवडणुकीत १३ पैकी फक्त ४ जागा जिंकता आल्या तर विधानसभा निवडणुकीत सफाया झालेल्या काँग्रेसने ७ जागा जिंकून राज्यात पुनरागमन केले. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला चांगले यश मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अर्थात राज्य विधानसभा निवडणुकीस अद्याप वेळ असल्याने त्याबाबत आताच अंदाज वर्तविणे योग्य ठरणार नाही.

**केजरीवाल राज्यसभेत? :** आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल हे स्वत: नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून पराभूत झाले आहेत. त्यांना विजय मिळाला असता तर त्यांना किमान विधानसभेत विरोधी पक्षनेता तरी होता आले असते. आपजवळ विरोधी नेता होण्यासाठी आवश्यक असलेले संख्याबळ असले तरी केजरीवाल यांना ती संधी मिळणार नाही. बहुधा ते मावळत्या मुख्यमंत्री आतिशी सिंग यांना विरोधी पक्ष नेत्या करतील, असे मानले जाते. मग स्वत; केजरीवाल काय करतील?

**महत्त्व संपले :** दिल्लीतील निकालांनी राष्ट्रीय राजकारणातील केजरीवाल यांचे महत्त्व संपुष्टात आले. दोन राज्यांत सरकार असणारा आप हा एकमेव प्रादेशिक पक्ष होता. आता केजरीवाल यांना राष्ट्रीय राजकारणात आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर त्यांना राज्यसभेत जाण्याशिवाय पर्याय नाही, असे मानले जाते. दिल्लीतून ते राज्यसभेवर जाऊ शकत नाहीत यासाठी त्यांना पंजाबचा रस्ता निवडावा लागेल. पंजाबमधील राज्यसभा निवडणुकीची प्रतीक्षा करणे वा मग आपच्या एखाद्या खासदारास राजीनामा देण्यास सांगून राज्यसभेवर निवडून जाणे अशा पर्यायावर ते विचार करू शकतात. राष्ट्रीय राजकारणात आपले अस्तित्व टिकविणे, पंजाब, दिल्ली या दोन्ही ठिकाणी आपची संघटना बळकट करणे, हेही त्यांच्यासमोरील एक मोठे आव्हान राहणार आहे. केजरीवाल हे हुकूमशाही शैलीत काम करणारे नेते आहेत. सत्ता असताना त्यांनी आपल्या काही प्रमुख नेत्यांना बाजूला सारले तरी त्यांच्या कार्यशैलीच्या विरोधात कुणीही आवाज उठविला नाही. कारण केजरीवाल यांच्याजवळ सत्ता होती. एक राष्ट्रीय वलय होते. आता ती स्थिती राहिलेली नाही. केवळ दिल्लीतील सत्ताच गेली असे नाही तर केजरीवाल व मनीष सिसोदिया हे दोघेही पराभूत झाले आहेत. आता अगदी विपरीत स्थितीत त्यांना काम करावे लागणार आहे. असलेला पक्ष शाबूत ठेवण्याचे आव्हान त्यांना हाताळावयाचे आहे. दिल्लीत केजरीवाल यांच्याजवळ आज २२ आमदार असले, तरी प्रत्यक्षात किती आमदार त्यांच्यासोबत राहतील, हा एक लाखमोलाचा प्रश्न राहणार आहे. एकदा का आमदारांनी पक्ष सोडणे सुरू केले तर मग कार्यकर्ते किती काळ या पक्षाला धरून राहतील, हा नंतरचा प्रश्न त्यांना भेडसावणार आहे.



**अनेक नेते कुंपणावर :** दिल्ली निकालानंतर आपचे अनेक नेते कुंपणावर आहेत. यात राघव चड्ढांसारखे काही राज्यसभा खासदारही आहेत. राघव चड्ढा तर कधी तळ्यात तर कधी मळ्यात याप्रमाणे कधी नवी दिल्लीत तर कधी लंडनमध्ये असतात. सर्वप्रथम तेच आप सोडण्याची शक्यता वर्तविली जाते. येणाऱ्या काळात केजरीवाल यांच्या कायदेशीर अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्या अडचणी सांभाळीत वरिष्ठ नेत्यांना सांभाळणे हे अवघड काम केजरीवाल यांना करावयाचे आहे आणि त्यांनी पंजाब गमावल्यास त्यांना आपला पक्ष सावरणे जवळपास अशक्य होऊन बसेल, असे मानले जाते.

**चळवळीचे भवितव्य :** आम आदमी पक्ष हा काही राजकीय पक्ष नाही. एक आंदोलन व चळवळ म्हणून आपचा जन्म झाला. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा देत आप अस्तित्वात आला आणि आता त्याच भ्रष्टाचारात बदनाम झाला. कधी काळी साधी राहणी ही आपची शिकवण होती. आता या पक्षालाही पंचतारांकित संस्कृतीने ग्रासले असल्याचे दिसते. प्रवचन आणि आचरण यातील हे अंतर आपला महागात पडले. ही सारी आव्हाने केजरीवाल कशी हाताळतात, यावर त्यांचे व त्यांच्या पक्षाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

**संघर्ष अटळ :** दिल्लीत आम आदमी पक्षाचा पराभव मुख्यपणे काँग्रेसमुळे झाल्याचे मानले जाते. दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची दोन टक्के मते वाढली आणि ही वाढलेली मतेच आपच्या पराभवास कारणीभूत ठरली असे आता दिसते. कारण आपची व्होट बँक हीच मुळी काँग्रेसची होती. काँगेसची व्होट बँक मोठ्या प्रमाणावर आपकडे गेली. काँग्रेस कमजोर झाली व आपचा जन्म झाला. काँग्रेसची ही व्होट बँक पुन्हा काँग्रेसकडे सरकल्याने आपच्या पायाखालील माती सरकली आणि दिल्लीत आप धराशायी झाली.

**पंजाबमध्ये पुनरावृत्ती :** पंजाबमध्ये हीच स्थिती राहणार आहे. पंजाबमध्ये आप नावाचा पक्षच नव्हता. राज्यात आम आदमी पक्षाने सत्ता मिळविली ती काँग्रेसची व्होट बँक आपल्याकडे खेचीत. विधानसभेनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने आपली व्होट बँक बऱ्याच प्रमाणात परत मिळविली. याचाच परिणाम म्हणजे काँग्रेसने लोकसभेच्या सात जागा जिंकल्या. असेच विधानसभा निवडणुकीत घडणार आहे. राज्यात काँग्रेसचा विजय म्हणजे आम आदमी पक्षाचा पराजय हे समीकरण ठरलेले आहे. केजरीवाल यांना बहुधा पंजाबमध्ये आपचे राजकीय भवितव्य स्पष्ट दिसत असावे. त्यांच्यासाठी आता दिल्लीपेक्षा मोठी काळजी पंजाब असावी.

**मर्यादित पर्याय :** केजरीवाल यांच्या मनात तर पंजाबचा मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न होते. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यास कोणतेही अधिकार नव्हते. त्या तुलनेत पंजाबचा मुख्यमंत्री शक्तिशाली मानला जातो. पण, काही कारणांमुळे केजरीवाल पंजाबचे मुख्यमंत्री होऊ शकले नाहीत. आता भगवंत मान यांना हटवून स्वत: मुख्यमंत्री होणे केजरीवाल यांना जड जाईल. आता त्यांना ते करता येणार नाही. अशा स्थितीत केजरीवाल यांच्यासमोर पंजाबमधून राज्यसभेवर निवडून जाणे व दिल्लीच्या आणि देशाच्या राजकारणात सक्रिय राहणे हाच एक पर्याय शिल्लक राहणार आहे. हॅट्ट्रिक करण्याच्या प्रयत्नात असलेल्या गोलंदाजाचा तिसरा चेंडू थेट मैदानाबाहेर मारला जावा, अशी स्थिती केजरीवाल यांची झाली आहे. ते सध्या तरी दिल्लीच्या मैदानाबाहेर फेकले गेले आहेत.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# आधुनिक भारताचे संरक्षण सामर्थ्य

'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून शस्त्रास्त्र निर्मितीत भारतीय तंत्रज्ञानाचा डंका वाजत आहे. अमेरिका, रशिया आणि चीनच्या तुलनेत भारत पिछाडीवर असला, तरी भारतीय तंत्रज्ञानाकडे जगाचा कल वाढत आहे. युक्रेनशी युद्ध सुरू असल्याने रशियावर अवलंबून असलेला आर्मेनिया भारताच्या आश्रयाला आला आणि अझरबैझानला भारतीय अस्त्रांच्या जोरावर गुडघे टेकण्यास भाग पाडले. आजपर्यंत भारत शस्त्रास्त्रांसाठी इतरांवर अवलंबून होता. परंतु, भाजपा सरकारने या क्षेत्रातही भारताला आत्मनिर्भर करण्याचा संकल्प केला आणि भारतीय संरक्षण प्रणालीने कात टाकली. भविष्यात युद्ध केवळ आकाश, जमीन अथवा समुद्रातच नाही, तर अवकाशातसुद्धा लढले जाणार आहे. त्यामुळे भारताने स्वत:च्या ताकदीवर परिणामकारक प्रणाली विकसित करून संपूर्ण जगाला आश्चर्याचा धक्का दिला. यंदा सरकारने संरक्षण क्षेत्रासाठी ६.८१ लाख कोटींची तरतूद केली. अमेरिका, चीन आणि रशियाच्या तुलनेत भारताचे बजेट कमी असले, तरी कमी खर्चात उच्च दर्जाची संरक्षण क्षमता विकसित करण्यात भारताचा हातखंडा आहे.

रशिया हा भारताचा मित्र देश आहे. त्यामुळेच अमेरिकेचा दबाव झुगारून भारताने रशियाकडून सर्वाधिक कच्चे तेल खरेदी केले. रशियाने भारताची सदैव पाठराखण केली आहे. चीनचे तगडे आव्हान निर्माण झाल्यानेच अमेरिकेने अलिकडे भारताशी जवळीक साधली आहे. कधीकाळी नरेंद्र मोदी यांना व्हिसा नाकारणारा अमेरिका आज त्यांचे गोडवे गात आहे! आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू अथवा मित्र नसतो, हे खरे असले तरी भारत मैत्रीभाव जपणारा देश आहे. पाकिस्तानशी झालेल्या युद्धावेळी बहुतांश जग जेव्हा भारताच्या विरोधात होते तेव्हा रशिया आणि इस्रायल हे दोनच देश भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले होते. राफेल ही लढाऊ विमाने भारताने फ्रान्सकडून खरेदी केलीत. परंतु, हे तंत्रज्ञान देण्यास फ्रान्स तयार नसल्याने भारताने स्वबळावर तेजस या जगातील सर्वाधिक हलक्या लढाऊ विमानाची निर्मिती करून इतिहास रचला.

२००९ ते २०१३ या चार वर्षांच्या काळात भारतातील तब्बल ११ शास्त्रज्ञांचा संशयास्पद मृत्यू झाला. यातील बहुतांश मृत्यूमागील कारणांचा उलगडा झालेला नाही. ऊर्जा क्षेत्रात भारताला स्वयंपूर्ण करण्याच्या प्रकल्पावर हे शास्त्रज्ञ काम करीत होते. हा एक गोपनीय प्रकल्प असताना इतक्या शास्त्रज्ञांचा मृत्यू कसा काय होऊ शकतो, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे स्वाभाविक आहे. भारत आणि रशियाने मिळून तयार केलेल्या ब्रह्मोस या क्षेपणास्त्राचा वापर अद्याप रशियाने युक्रेन युद्धात केलेला नाही. यावरून या क्षेपणास्त्राची मारक क्षमता ध्यानात घ्यावी. अणुबॉम्बमुळे रासायनिक अस्त्रांची गरज संपुष्टात आल्याने भारताने १९९२ मध्ये रासायनिक शस्त्रास्त्र करारावर स्वाक्षरी केली. भारताकडे सध्या २०० च्या जवळपास अणुबॉम्ब असल्याचे सांगण्यात येते. जगात सर्वाधिक अणुबॉम्बचा साठा रशियाकडे आहे. आधुनिक अणुबॉम्बची क्षमता जपानवर टाकलेल्या अणुबॉम्बच्या तुलनेत हजारोपट आहे. त्यामुळे कोणताही देश अणुबॉम्बचा वापर करण्याची शक्यता वाटत नाही. परंतु, कारगिल युद्धात पाकिस्तानने भारतावर अणुहल्ला करण्याची तयारी केली होती. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना अमेरिकन राष्ट्रपतींनी पाकिस्तान भारतावर अणुहल्ला करणार असल्याची माहिती फोनवरून दिली. अटलजी डगमगले नाहीत आणि 'पाकिस्तानने अणुहल्ला केलाच तर भारताचा एखादा भाग नष्ट होईल. परंतु, भारताच्या प्रत्युत्तरात पाकिस्तान उद्याचा सूर्य पाहू शकणार नाही, इतकी हमी मी आपणास देतो!' अशी गर्जना अटलजींनी केली आणि मग पाकिस्तानने मैदान सोडून पळ काढला. रशिया-युक्रेन युद्धात छोटे छोटे आत्मघाती ड्रोन्स खूपच प्रभावी ठरले आहेत. असे आत्मघाती ड्रोन्स निकामी करणारी यंत्रणा भारताने झटपट विकसित करून संपूर्ण जगात खळबळ उडवून दिली आहे. सध्या हे तंत्राज्ञान फक्त भारताकडे उपलब्ध आहे. ज्या छोट्या देशांना पुढारलेले देश शस्त्रास्त्र पुरविण्यास तयार नाही, असे सर्व देश आज भारताकडे आशेने पाहात आहे. भारतानेही अशा देशांना शस्त्रसज्ज करण्यास पुढाकार घेतला आहे. भारत हा जगातील सर्वाधिक शस्त्रास्त्र खरेदी करणारा देश आहे. परंतु, मेक इन इंडियाच्या माध्यमातून हे अवलंबित्व आता जवळपास १५ टक्क्यांनी कमी झाले आहे. भविष्यात शस्त्रास्त्र निर्मिती आणि निर्यातीत भारत एक प्रमुख देश म्हणून पुढे येऊ शकतो आणि त्या दिशेने युद्धपातळीवर काम सुरू आहे. भारताची शस्त्रास्त्र निर्मिती स्वसंरक्षणासाठी आहे आणि या क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करणे, हीच देशाच्या संरक्षणाची हमी आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# कसे कुणाचे सांगा चुकले?

तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज शिरीष महाराज मोरे यांचे जाणे अतिशय धक्कादायक आणि वेदनादायक होते. त्यांचे निधन झाले ही बातमी जेवढी धक्कादायक आणि वेदनादायक होती, त्याहीपेक्षा शेकडोपटीने वेदना त्यांच्या आत्महत्येने झाल्या. काही वर्षांपूर्वी भय्यूजी महाराजांनी आत्महत्या करून हे जग सोडण्याचा निर्णय घेतला, त्याही वेळेला अशाच वेदना झाल्या होत्या. अशा मोठ्या, जाणत्या, समजूतदार लोकांना आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागतो, हे दुर्दैवच म्हणावे लागेल. सामान्य रोगाने झालेले निधन वा मृत्यू हा अनेक प्रश्नांचे उत्तर देऊन जातो, परंतु आत्महत्यांनी ओढवलेला मृत्यू हा अनेक प्रश्न निर्माण करून जातो.

शिरीष महाराजांचे वय अवघे ३० वर्षे होते. नुकतेच त्यांचे लग्न जमलेले होते. तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज हा बहुमान त्यांना मिळालेला होता. शिवशंभू विचार मंचाचे ते पश्चिम महाराष्ट्राचे संयोजक होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी शेकडो भाषणे केलेली होती. 'शिवराज्याभिषेक' हे त्यांचे अलिकडेच प्रकाशित झालेले पुस्तक. प्रत्येकाला हवाहवासा वाटणारा त्यांचा सहवास होता. महाराष्ट्रामध्ये चालणारे ब्रिगेडी राजकारण, त्यातून संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्यामध्ये निर्माण केलेली जातीयवादी दरी या सर्व पृष्ठभूमीवर शिरीष महाराज हे अशा कुठल्याही विषयावर बोलायला अधिकारी पुरुष होते.

एखाद्या समाजामध्ये एखादा हिंदुत्ववादी कार्यकर्ता तयार होणे ही एक मोठीच उपलब्ध असते. असे व्हायला अनेक वर्षे आणि अनेकांचे परिश्रम लागतात. शिरीष महाराजांसारखा एक समजूतदार कार्यकर्ता या निमित्ताने हिंदुत्ववादी चळवळीला मिळालेला होता. त्याचबरोबर त्याला जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा वारसाही होता. ११ वे वंशज असण्याचा बहुमानही होता. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राकरिता व जातीयवादी शक्तींच्या विरोधात हिंदुत्ववादी चळवळीला गवसलेला हा एक हिराच होता. त्यांच्या हातून देश-धर्म-संस्कृतीची अजून खूप मोठी सेवा होणे बाकी होते. त्यांनी घेतलेला आत्मघातकी निर्णय हा सर्वांसाठीच नुकसानदायक झाला.

आत्महत्येच्या मार्गाला आपल्या शास्त्र पुराणात योग्य मानलेले नाही. 'ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान ।' एखाद्याची परिस्थिती गरिबीची असेल किंवा श्रीमंतीची असेल, तो रोगाने ग्रस्त असेल किंवा परिस्थितीने ग्रस्त असेल, तरी या जन्मातील सर्व कष्ट, दु:ख याच जन्मात भोगून संपविली पाहिजेत. प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांना १४ वर्षांचा वनवास भोगावा लागला. पांडवांना राज्याचे उत्तराधिकारी असताना वनामध्ये जावे लागले. द्रौपदीसारख्या मानी स्त्रीला वस्त्रहरणासारखा अपमान सहन करावा लागला. हे सर्व प्रसंग नैराश्याने भरलेलेच होते. द्रौपदी आत्महत्येचा विचार करू शकली असती, इतका तिचा अपमान झाला होता. परंतु तिने आपल्या अपमानाचे स्मरण ठेवण्यासाठी आपले केस मोकळे ठेवले. पांडवांना अपमानाचा प्रतिशोध घेण्याची प्रेरणा दिली. एका स्त्रीच्या वस्त्रांना हात घालणारे कौरवांचे हात तिने निष्प्राण केले.

महाराणा प्रताप हळदी घाटीचे युद्ध हरला, त्याचे सैन्य मारले गेले. अकबराच्या सैन्यांनी त्याच्या प्रमुख किल्ल्यांवर ताबा मिळविलेला होता. सैन्य जमवायला व चालवायलाही पैसा उरलेला नव्हता. अशा परिस्थितीमध्ये त्याला त्याच्या परिवाराला घेऊन अरावली पर्वताच्या जंगलांचा आश्रय घ्यावा लागला. सैन्य नाही, राज्य नाही, राहायला घर नाही. याच्यापेक्षा वाईट परिस्थिती कुठल्याही राजावर का यावी? अशा परिस्थितीत महाराणा प्रतापांनी अरावली पर्वताच्या जंगलांमध्ये राहणाऱ्या भिल्लांना एकत्र केलं. त्यांचे सैन्य उभे केले व पुन्हा एकदा अकबराशी लढाई मांडली. पुरंदरच्या तहानंतर शिवाजी महाराजांना आपले अनेक किल्ले औरंगजेबाला द्यावे लागले. संभाजी राजांना त्याची मनसबदारी स्वीकारावी लागली. परिस्थिती प्रतिकूल होती. सेनापती नेताजी पालकर औरंगजेबाला जाऊन मिळालेला होता. अनेक नात्यागोत्यातले मराठे कोणी आदिलशहाकडे होते तर कोणी औरंगजेबाकडे होते. अशाही परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी हार मानली नाही व त्यांनी आपला स्वातंत्र्याचा यज्ञ सुरूच ठेवला. त्यातूनच पुढे मराठ्यांचे साम्राज्य उभे झाले. आजही छत्रपती शिवाजी महाराज आमच्यासमोर प्रेरणापुरुष आहेत.

शिरीष महाराजांच्या आत्महत्येमागे कदाचित काही कारणे असतीलही. त्यातील एक कारण त्यांनी चिठ्ठीमध्ये लिहिलेले आहे. ते म्हणजे त्यांच्यावर असलेलं कर्ज. वास्तविक पाहता कर्जबाजारी कोण नाही? आमचा देशसुद्धा कर्जबाजारी आहे. जगाचा दादा म्हणणारा अमेरिका कर्जबाजारी आहे. भारतामध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्येक बाळावर काही हजार रुपयांचे कर्ज आहे. मला काही तरुण माहीत आहेत, ज्यांनी काही काम करण्याचा प्रयत्न केला, त्यात ते अपयशी ठरले आणि त्यांच्यावर एक कोटी रुपयांपेक्षा अधिकचे कर्ज झाले. वास्तविक पाहता या सर्व तरुणांनी आत्महत्या करायला हवी होती. परंतु जेव्हा जेव्हा त्यांच्याशी संवाद होतो त्या प्रत्येक वेळेस मी त्यांना म्हणतो, मार्ग निघेल. हे दिवस संपतील आणि कर्जही संपेल. आज-काल सर्वत्र संवादहीनता निर्माण झालेली आहे. घरामध्ये, समाजामध्ये, सामाजिक संस्थांमध्ये ती दिसून येते. शिरीष महाराजांसारखा इतका लाखमोलाचा कार्यकर्ता त्याला जर काही वेदना होत्या, त्याला जर कशाची चिंता होती तर ही चिंता वरिष्ठ लोकांनी ओळखायला पाहिजे होती. पूर्वीच्या काळी ज्येष्ठ लोक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा संपूर्ण विचार करायचे. त्याच्या घरी कोण आहे, त्याच्या घरची परिस्थिती कशी आहे, हा किती वेळ देऊ शकेल, याने अधिक वेळ दिला पाहिजे यासाठी याच्या जीवनाची रचना कशी करावी लागेल, असा सर्व विचार करून ते त्याला मार्गदर्शन करीत जायचे. परंतु आता असे ज्येष्ठ-श्रेष्ठ लोक समाजात कमी आणि सामाजिक संघटनांमध्येसुद्धा कमी झालेले आहेत. त्यामुळे 'जब तक बल्ला चलता है...' तोपर्यंत तुमची आठवण केली जाते आणि त्यानंतर असे मोठमोठे कार्यकर्ते विस्मृतीत जातात. वास्तविक पाहता त्यांच्याकडून देशाची, समाजाची अजून खूप मोठी सेवा बाकी असते. परंतु तरीही असे अनेक लोक विस्मृतीत जातात, कामाच्या बाहेर जातात. यांना धरून ठेवणाऱ्या माणसांची कमतरता आहे. पूर्वी संघटन मोठे झाले ते एकेक माणूस जोडून ठेवल्यानेच झाले. शिरीष महाराजांना थांबवता आले असते. पण दुर्दैवाने थांबविणारा नव्हता म्हणून ते गेले. असे पुन्हा होऊ नये यासाठी विविध संघटनांच्या ज्येष्ठ-श्रेष्ठ लोकांनी विचार करण्याची आवश्यकता आहे व कार्यकर्त्यांना 'ध्येय मार्ग पर चले वीर तो, पीछे अब न निहारोफ्ल, हिम्मत कभी न हारो' असा मंत्र देण्याची आवश्यकता आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### छत्रपती शिवरायांची वाघनखे

छत्रपती शिवरायांच्या जीवनातील अनेक धाडसी व स्फूर्तिदायक प्रसंग आपल्या राष्टजीवनात परिवर्तन घडवून समाजातील सज्जनशक्तीचा प्रभाव निर्माण करतात. आपला भारतीय समाज विजयाचा पूजक आहे. छत्रपती शिवरायांच्या प्रत्येक शस्त्राला शौर्याचा इतिहास आहे. शिवकालीन अनेक शस्त्रांपैकी वाघनखं हे आकाराने लहान व हाताच्या मुठीत लपविलेल्या शस्त्राची नोंद सुवर्ण अक्षराने अंकित झाली.

१० नोव्हेंबर १६५९, गुरुवार या दिवशीचा प्रसंग हा अधर्माच्या दुष्टशक्तीला केवळ नाश करणाराच नव्हे तर धर्माचे संरक्षण करण्यासाठी प्रेरणादायी ठरला. प्रतापगडावर महाराज अफजलखानाच्या भेटीसाठी निघाले. जिवा महाला, सकपाळ, संभाजी कावजी कोंढाळकर, संभाजी करवर, सिद्धी इब्राहिम, येसाजी कंक वगैरे दहा जिवलग सोबत होते. भव्य शामियान्याच्या दाराशी महाराज पोहोचले. धिप्पाड अफजलखान अहंकाराने ओतप्रोत भरला होता. त्याने महाराजांना मिठी मारली. अन् क्षणातच त्याने महाराजांचे मस्तक आपल्या डाव्या बगलेत जोरात डाव्या हाताने करकचले. अन्? आपली कट्यार काढून महाराजांच्या कुशीवर तडाखून घाव घातला. तो घाव नुसताच खरखरला. कारण महाराजांच्या



अंगात पोलादी चिलखत होते. त्याच्या हे लक्षात आले असावे. कारण त्याने लगेच दुसरा घाव घालण्याकरिता कट्यार उगारली अन् तो घाव घालणार, एवढ्यात महाराजांनी आपल्या डाव्या हाताच्या बोटात घातलेली वाघनखं खानाच्या पोटात खुपसली. किंकाळी फुटली. अफजल्या शरीराने बलदंड होता तो काही एका वाराने मरणार नव्हता. महाराजांनी वाघनखाचे दोन-तीन वार घातल्याने खानाची आतडी बाहेर आली. खान कोसळला. प्रतापगडावर वाघनखं या गप्त शस्त्राने महाराजांनी विजयाचं शौर्य गाजविले. महाराजांच्या या तेजस्वी शौर्यासोबत वाघनखं सुद्धा अजरामर झालीत. त्यामुळे वाघनखं मस्तकी धरली पाहिजेत. शिवरायांनी वापरलेली वाघनखे शौर्याचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवरायांना मानाचा त्रिवार मुजरा!

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

## वाचक पत्रे

### घुसखोरांविरुद्ध कठोर कारवाईची गरज

आपला भारत देश सुखी, समृद्ध व विकसित व्हावा यासाठी सर्व पातळ्यांवर, युद्धस्तरावर प्रयत्न होत असताना आपण बघतो. सरकारचे काटेकोरपणे होत असणारे मूल्यमापन, नियोजन, नवनवीन कायदे व अनुशासन याद्वारे होणारे प्रयत्न आपण बघत आहोत. एवढं होत असलं तरी खऱ्या अर्थाने आपण विकसित होणार आहोत का? असा जर प्रश्न विचारला तर उत्तर नकारार्थी असेल. मग काय कारण आहे की जे देशाला विकसित होण्यास बाधक ठरत आहे. माझ्या मते ते एकमेव मुख्य कारण म्हणजे या देशात जे देशविरोधी असंख्य लोक देशाला पोखरत आहेत त्यांचा न होणारा खात्रीशीर उपाय.

प्रथम तर जे शेजारी देशातील घुसखोर व नंतर देशातील विश्वासघातकी लोक. कितीही कायदे व उपाय करून हा प्रश्न सुटणारा नाही. येथे निदान घुसखोरांना तरी डोनाल्ड ट्रम्प यांचा फॉर्म्युला वापरायला काय हरकत आहे. राहिला प्रश्न विश्वासघातकी लोकांचा. त्यांच्यासाठी एकच उपाय आहे तो म्हणजे अशांचं निर्मूलन वा उच्चाटन. पण पुढे प्रश्नच तो म्हणजे हे करावं कुणी आणि कसं! हे प्रश्न अनुत्तरित राहू नये म्हणून कुणीतरी पुढाकार घ्यावा, असे वाटते.

**शिरीष घिर्णीकर**/मलकापूर

●● ●●

### सुधारित सायबर क्राईम कायद्याची आवश्यकता

एकीकडे शासन भ्रमणध्वनीवर सायबर क्राईमपासून सावध राहा, अशा सूचना देत आहे. त्याचवेळी, रमी सर्कल वगैरे वेगवेगळी आमिषे दाखवणाऱ्या जाहिराती बेधडकपणे युट्युबवर आणि प्रत्येक व्यक्तीच्या भ्रमणध्वनीवर दिसत असतात. आणि त्यांची जाहिरात करणारा चित्रपटातील प्रसिद्ध हिरो असतो, असा विरोधाभास आहे. जर ही सगळी अवैध पैसे मिळवण्याची माध्यमे शासनस्तरावरच बंद केली, तर सायबर क्राईमला आळा बसू शकेल. यासाठी, सोशल मीडिया प्रसार आणि सायबर क्राईम याविषयी सुधारित नियमावली तयार करण्यात यायला हवी. सायबर क्राईमसाठी कठोर शिक्षेची अंमलबजावणी व्हायला हवी. विशेष म्हणजे रमी सर्कल आणि तत्सम जाहिरातीवर बंदी घालण्यात यावी.

चुकीच्या विचारांचा प्रसार करणाऱ्या युट्युबसारख्या ॲप्स आणि जाहिरातींवर आळा बसवण्यासाठी परिणामकारक न्यायसंहिता बनेल, त्या दिवसापासून सोशल मीडिया आणि सायबर जगताला एक नवी योग्य दिशा प्राप्त व्हायला सुरुवात होईल, असे म्हणायला हरकत नाही.

**- मेघश्याम दळवी**/नागपूर

●● ●●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Made with Xodo PDF Reader and Editor



# किनवट व माहूर येथे मुला-मुलींच्या वसतिगृहासाठी ४० कोटींचा निधी

## सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १७ फेब्रुवारी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून दिलेल्या आरक्षणामुळे मी आज या महाराष्ट्र राज्याचा मंत्री आहे असे स्पष्ट करत ग्रामीण, दुर्गमभागातील विद्यार्थ्यांना शहरात राहून शिक्षण घेता यावे यासाठी किनवट येथे वसतिगृह उभारण्यासाठी २० कोटी रुपये तर माहूर येथे स्वतंत्र मुलींच्या वस्तीगृहासाठी २० देण्याची घोषणा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री नामदार संजय शिरसाठ यांनी किनवट येथे केली असून पुढच्या वर्षी मी स्वतः वसतिगृहाच्या इमारतीचे उदघाटन करून धम्म परिषदेला येईन असे आश्वासनही त्यांनी दिले आहे.

समता नगर येथील बुद्धमूर्ती परिसरात दि १६ फेब्रुवारी रोजी आयोजित १४ व्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेतील समारोपीय सत्रात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार भीमराव केराम हे होते तर मंचावर हदगाव हिमायतनगर विधानसभेचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, उमरखेड विधानसभेचे माजी आमदार विजयराव खडसे बसपाचे मनीष कावळे पीरीपाचे जिल्हाध्यक्ष विनोद भरणे माजी नगराध्यक्ष अरुण आळणे,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार,बालाजी मुरकुटे अजय कदम पाटील सुरज



सातूरवार,स्वागत आयनेनिवार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. पुढे बोलताना ना. संजय शिरसाट म्हणाले की चाळीस वर्षापासून मी एक कार्यकर्ता म्हणून चळवळीत काम केले माझ्या कुटुंबात कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही स्वकर्तत्वावर मी नगरसेवक झालो आणि त्यानंतर थेट मंत्री झालो आज माझं जेकाही वैभव आहे ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची पुण्याई आहे संविधानातील आरक्षणामुळे मी या राज्याचा मंत्री आहे. या धम्म परिषदेच्या निमित्ताने तुमच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधता यावा म्हणून मी उपस्थित राहिलो किनवट माहूर तालुक्यातील जनतेला भौतिक सोयी सुविधा देण्यासाठी आमदार आहेत परंतु उपेक्षित वंचित शोषित वर्गातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शहराच्या ठिकाणी राहून शिक्षण घेता यावे यासाठी किनवट येथे वसतिगृह उभारण्यासाठी २० कोटी रुपये तर माहूर येथे स्वतंत्र मुलींच्या वस्तीगृह उभारणीसाठी २० कोटी रुपयाचा निधी देण्याचे मी जाहीर करतो. वर्षभरात दोन्ही वस्तीगृहाचे काम वर्षभरात पूर्ण करून मी स्वतः उद्धाटन करून धम्म परिषदेला उपस्थित राहील असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले आहे. अध्यक्षीय समारोप करताना आमदार भीमराव केराम म्हणाले की किनवट ही फुले शाहू आंबेडकरी चळवळीची भूमी आहे. मागील १४ वर्षापासून या ठिकाणी भव्य अशा यशस्वी धम्म परिषदा संपन्न झाल्या परंतु आजपर्यंत या धम्म परिषदेला मंत्रिपदावर असलेला कोणीही व्यक्ती उपस्थित राहू शकला नाही परंतु आमच्या विनंतीवरून सामाजिक न्यायमंत्री उपस्थित राहिले हे आम्ही आमचे भाग्य समजतो. बौद्धमूर्ती परिसराला बौद्ध तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची मागणी आमदार भीमराव केराम मंत्री संजय शिरसाठ यांच्याकडे केली. यावेळी आमदार बाबुराव कदम कोहळीकर,माजी आमदार विजयराव खडसे यांनीही त्यांच्या मनोगतातुन तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनकार्यावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक भाषणातून दया भाऊ पाटील यांनी धम्म परिषदेच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. सूत्रसंचालन उत्तम कानींदे यांनी केले तर ऍड सुनील येरेकार यांनी उपस्थिताचे आभार व्यक्त केले.धम्मपरिषदेच्या यशस्वीतेसाठी विशाल हलवले, निखिल कावळे, राहुल सर्पे, सुनील भरणे, गोलू आढागळे, संदीप दोराटे, अरुण शेंद्रे, निवेदक कानिंदे, दत्ता कसबे,गौतम धावरे, राहुल चौदंते, सुगत नगराळे, विजय पाटील आदींनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### सैनिकी विद्यालयाच्या वैभव तुरुकवाडचे जे.ई.ई. परीक्षेत यश



**बिलोली**-नुकताच जे.ई.ई. परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून बिलोली तालुक्यातील सगरोळी (ता.बिलोली) येथील सैनिकी विद्यालायाच्या वैभव तुरुकवाड या विद्यार्थ्याने ९१.५२ पर्सेंटाईल गुण मिळवीत सुयश संपादन केले आहे. सगरोळी सारख्या ग्रामीण भागात कोचिंग घेऊन हे यश संपादन केल्याने सगरोळी व परिसरातील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून आत्मविश्वास वाढला आहे. इयत्ता १० वी नंतर JEE/NEET/ND च्या तयारीसाठी विद्यार्थी व पालकांचा ओढा हा शहरातल्या विविध क्लासेसकडे असतो. मात्र ग्रामीण भागातील सामान्य व आर्थिक पाठबळ नसणाऱ्या गटातील पालकांना शहरातील क्लासेसचे शुल्क शिवाय निवास व भोजनाची व्यवस्था आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसल्याने त्यांचे पाल्य JEE/NEET/ND सारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीपासून वंचित राहातांना दिसतात. होतकरू व अभ्यासू विद्यार्थ्यांना इतरांप्रमानेच समान संधी मिळावी म्हणून बिलोली तालुक्यातील सगरोळी येथील संस्कृति संवर्धन मंडळ संस्थेने गतवर्षी कोटा (राजस्थान) येथील प्राध्यापकांची नेमणूक केली. कोटा येथील तज्ञ अध्यापकांचे मार्गदर्शन येथील सैनिकी विद्यालय व शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळत आहे. JEE/NEET/ND चे थेओरी क्लासेस, अभ्यासिका व साप्ताहिक चाचणीचे नियोजन केले होते. इयत्ता सहावी ते दहावी वर्गापासून JEE/NEET/ND चे फाउंडेशन क्लासेस देखील सुरु करण्यात आले. त्यामुळे सामान्य शेतकरी कुटुंबातील वैभव तुरुकवाड याने जानेवारी महिन्यात झालेल्या केंद्र स्तरावरील जे.ई.ई.परीक्षेत एस.टी. प्रवर्गातून ९१.५२ पर्सेंटाईल गुण मिळवत उत्तम यश मिळवले. पहिल्याच वर्षी येथील विद्यार्थ्याने यश संपादन केल्याने इतर विद्यार्थ्यामधील आत्मविश्वास दुणावला आहे. वैभवच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन प्रमोद देशमुख, सचिव डॉ. जयंत जकाते, प्राचार्य गिरीश आलुरकर, प्राध्यापक विकास तिवारी यांनी कौतुक केले आहे.

### पियूष सब्बनवारचे जेईई मेन्स परिक्षेत यश



**कुंडलवाडी**-येथील रहिवाशी पियूष नरेश सब्बनवार जेईई मेन्स परिक्षेत यश सपांदन केले आहे. सन२०२४-२०२५ मध्ये झालेल्या जेईई मेन्स परिक्षेचा निकाल नुकताच लागला असून या परिक्षेत ८४.९५टक्के (पर्स.) गुण घेऊन पियुष नरेश सब्बनवार हा एडव्हान्स परीक्षे साठी पात्र ठरला आहे.पियुष सब्बनवार हा कुंडलवाडी पद्मशाली समाज संघटनेचे उपाध्यक्ष ,पानसरे महाविद्यालयाचे संचालक, कुंडलवाडी विविध सहकारी सोसायटी चे संचालक नरेश सब्बनवार यांचा मुलगा आहे. त्यांच्या यशा बद्दल कुंडलवाडी शहरात सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### श्रीतेश मानेचे जे.ई.ई.मेन्स परिक्षेत यश

**नायगांव**-नायगांव तालुक्यातील ग्रामीण भागातील बरबडा येथील जवाहरलाल नेहरू ज्यूनियर कॉलेजचा श्रीतेज दिलीप माने नी आपल्या अभ्यासातील सातत्यपणा जिद्द आणि परिश्रमाच्या बळावर पहिल्याच



प्रयत्नात जे.ई.ई या मेन्स परिक्षेत९८.४३पर्सेन्टाईल गुण घेऊन घवघवीत यश संपादित केले आहे. मुदखेड तालुक्यातील कोल्हा या ग्रामीण भागातील श्रितेज दिलीपराव माने हा बरबडा येथील जवाहरलाल नेहरू ज्यू.कॉलेजच्या विद्यार्थ्याने गेली दोन वर्षे नांदेड येथील आय आय बी या सारख्या खासगी शिकवणीतून अध्यापनाचे धडे घेत आपल्या अभ्यासातील जिद्द आणि चिकाटी परिश्रमातील सातत्यपणाच्या बळावर दि.१२ फेब्रुवारी रोजी नुकत्याच लागलेल्या जे.ई.ई या मेन्स परिक्षेत ९८/४८ पर्सेन्टाईल गुण मिळवित घवघवीत यश संपादन केल्यामुळे मुदखेड तालुक्यातील,नायगांव तालुक्या तील शैक्षणिक क्षेत्रातील मरवाळीतांडा येथील उच्च माध्यमि क ज्यूनियर कॉलेज, माध्यमिक आश्रम शाळेतील शिक्षक वृंद, प्राध्यापक वृंद ,सामाजिक, राजकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर मंडळी कडून श्रितेज दिलीप राव माने वर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

### सदेह वैकुंठ गमन सोहळ्याच्या अध्यक्षपदी सोपान मोरे तर उपाध्यक्षपदी गणेश मोरे

**सोनखेड**-श्री.संत तुकाराम बीज उत्सवाच्या अध्यक्षपदी सोपान मोरे तर उपाध्यक्षपदी गणेश श्रीराम मोरे यांची निवड १६ जानेवारीला करण्यात आली आहे. जगद्गुरु श्री. संत तुकाराम महाराज संस्थांनचे अध्यक्ष भगवानराव मोरे यांच्या उपस्थितीत महारुद्र हनुमान मंदिर सोनखेड येथे सर्वानुमते निवड करण्यात आली. श्री क्षेत्र देहू येथे श्री. संत जगद्गुरु तुकोबारायांचा त्रिशतकोत्तरी सदेह वैकुंठ गमन अमृत महोत्सवी सोहळा म्हणजेच ३७५ वर्ष असून हा सर्वत्र साजरा केला जात आहे. त्याच धर्तीवर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रती देहू असलेले जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा बीज उत्सवाचा कार्यक्रम सोनखेडमधे मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा केला जातो. त्या अनुषंगाने ही समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामध्ये सचिव गणेश हांडे, बळीराम मोरे, सुदामराव मोरे,सुनील मोरे, नरसिंग मोरे, अंकुश मोरे, गंगाधर मोरे, विठ्ठल मोरे,लक्ष्मण मोरे,पांडुरंग मोरे, माणिक मोरे, रामकिसन तिरवड, वामन मोरे, सुरज मोरे, सदाशिव मोरे, शुभम मोरे यांची निवड करण्यात आली.

### कचरू गोधने यांचे निधन

**नांदेड**- कंधार तालुक्यातील फुलवळ येथील ज्येष्ठ नागरिक कचरू पिरताजी गोधने ( वय ९० ) यांचे रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. आज सोमवारी दुपारी एक वाजता फुलवळ ता.कंधार येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी ,एक मुलगा ,चार मुली ,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.फिजिक्स कोचिंग क्लासेसचे संचालक संजय गोधने यांचे ते वडील तर दै.सत्यप्रभाचे उपसंपादक माधव गोधणे यांचे चुलते होत.

## रयत प्रतिष्ठानच्या वतीने अनाथ मुलीला मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर ,दि. १७ फेब्रुवारी**

हिमायतनगर तालुक्यातील सोनारी येथील अनाथ मुलीला मदतीसाठी रयत प्रतिष्ठान चे अध्यक्ष सहशिक्षक सटवाजी पवार सर जवळगावकर यांनी रयत प्रतिष्ठान ग्रुप वर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत दानशूर व्यक्तींच्या दायित्वाने जमा झालेल्या योगदानाचे किराणा साहित्य कपडे शैक्षणिक साहित्य व गरजेनुसार आवश्यक मदत आज त्यांच्या घरी जाऊन आजीकडे मदत सुपुर्द करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते राजु पांडे हदगांवकर , रयत प्रतिष्ठान अध्यक्ष सटवाजी पवार जवळगावकर सर सामाजिक कार्यकर्त्या सवीताताई निमडगे पळसेकर हिमायतनगर तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक आबाराव पाटील, भगवानराव पाटील ,विनायकराव पाटील, श्रीदत्त पाटील ,संतोष पाटील, प्रदिप पाटील, गजानन महामुने पोलिस पाटील ,राजाराम पवार गजानन दुर्गकर,,साबेरभाई हिमायतनगरकर, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर दहिभाते बरडशेवाळा यांच्या सह सामाजिक कार्यातील अग्रेसर मंडळी पत्रकार बांधव उपस्थित होते.

## शिवजयंती निमित्त व्याख्याते गणपत माखणे यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १७ फेब्रुवारी**

कुळवाडी भूषण जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उमरीत सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंती थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे.दिनांक १९ फेब्रुवारी रोज बुधवार ध्वजारोहण व साडेनऊ वाजता शिवव्याख्याते शिवश्री गणपत माखणे यांचे व्याख्यान उमरी मोंढा मैदान येथे होणार आहे. तरी शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## भोकर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १७ फेब्रुवारी**



भोकर विधान सभा मतदार संघात दि. २० फेब्रूवारी गूरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट)भव्य मेळाव्याचे आयोजन नवा मोंढा भोकर येथे करण्यात आले आहे.

या मेळाव्यास नांदेड जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी खासदार तथा विद्यमान आ.प्रतापराव पाटील चिखलीकर तसेच पदविधर मतदार संघाचे आ.सतीश चव्हाण, शिक्षक मतदार संघाचे आ.विक्रम काळे, जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी महानगराध्यक्ष जीवन घोगरे, भोकर तालूकाध्यक्ष राजेश देशमूख, शशी पाटील, आनंद टिपरसे, बाळासाहेब पा.रावणगावकर, माजी कृषि सभापती सूरेशभाऊ बिल्लेवाड, माजी उपसभापती यांच्यासह सर्व सेल चे पदाधिकारी आदींची उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यास सर्व कार्यकर्ते उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भोकरच्या वतीने करण्यात आले आहे.

## संत सेवालाल महाराज मंदिरासाठी जागा देणार : शिरशेटवार

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. १७ फेब्रुवारी**

बंजारा समाजाचे आराध्य दैवत क्रांतीसूर्य सेवालाल महाराज यांची २८६ वी जयंती संपूर्ण महाराष्ट्र भर अतिशय उत्साहात साजरा करण्यात आली. सद्गुरू सेवालाल महाराज यांच्या जयंतीचे औचीत्य साधून देगलूर शहरामध्ये असलेले नामांकित महाविद्यालयासमोर तसेच मुख्य रस्त्यांवर असलेल्या सदगुरू सेवालाल महाराज चौक येथे बंजारा परंपरेनुसार भोग विशाल पवार यांच्या हस्ते लावण्यात आले. सदगुरू सेवालाल महाराज की... जय या जय घोषाने आजूबाजूचे परिसर दुमदुमले.

या आयोजित कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेत विशाल पवार यांनी समाजाच्या व्यथा मांडल्या,वाडी वस्ती तांड्यावर असणाऱ्या लोकांना न्याय मिळविण्यासाठी मी सदैव तयार आहे व जिथे कुठे समाज संकटात असेल तेथे मी असेल असे ही ते म्हणाले आणि मा. नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांच्या कडे समाज मंदिरासाठी जागा देणायाची मागणी केली. कार्यक्रमाच्या वेळी देगलूर नगरीचे माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार म्हणले की संपूर्ण देशभरत बंजारा समाज असून जगाला शांतीचा संदेश देण्याचं काम सद्गुरू सेवालाल महाराज यांनी केलं आहे. विशाल पवार यांच्या मागणी नुसार मी येत्या काळात समाजाच्या समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करून देईन असे म्हणाले.

यावेळी मा. नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, गटशिक्षणाधिकारी कृष्णा तोटावार,काँग्रेस चे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे, एकनाथ टेकाळे,संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष जेजेराव पाटील, जिजाऊ ब्रिगेड अध्यक्षा चैतन्या वानखेडे, सचिव रंजना मानूरे, भाजप चे भावना दाशेटवार,प्रल्हाद नाईक,तानाजी चव्हाण,तुकाराम पवार,लक्ष्मण तोटावार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी राठोड यांनी केले तर बि. एम पवार यांनी सर्व समिती मंडळाचे तसेच समाज बांधवांचे आभार व्यक्त केले, यावेळी समस्त बंजारा समाजबांधव उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष जाधव, नागोराव चव्हाण,शिवाजी चव्हाण,वसंत पवार,विजयकुमार राठोड,बालाजी जाधव, संदीप चव्हाण,राहुल पवार,राहुल आडे,बजरंग चव्हाण, कपिल नाईक, गणेश पवार, नाळू पवार, सुरेश पवार, रमेश चव्हाण,राजू जाधव यांच्या सह अनेक युवकांनी परिश्रम घेतले.

## डॉ. आंबेडकरांनी महिलांना ५० टक्के आरक्षण दिले : खा. रवींद्र चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. १७ फेब्रुवारी**

सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार चॅरटेबल ट्रस्ट येथे माता रमाई आंबेडकर जयंती निमित्त बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून महिलांना ५० टक्के आरक्षण दिले.तेंव्हा आपण उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर असणं हीच खरी महापुरुषांना आदरांजली आहे,



असे मत नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार रवींद्र चव्हाण यांनी उपस्थित समाज बांधवासमोर व्यक्त कले.

माता रमाई आंबेडकर परिषदेनिमित्त आयोजित रमाई आंबेडकर जयंती सोहळ्याचे आयोजन आम्रपाली महिला मंडळांनी केली होता. या परिषदेचे उद्घाटन पूज्य भंते पयाबोधी थेरो यांनी केले याप्रसंगी नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार रवींद्र चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थिताना संबोधित करताना खासदार रवींद्र चव्हाण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बरोबरीने लढा देण्यासाठी रमाईने किती कष्ट उचलले आणि किती संकटांना तोंड द्यावे लागले हे आपल्या विचाराच्या बाहेर असल्याचे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून महिलांना ५० टक्के आरक्षण देऊन त्यांचे सक्षमीकरण केले आसल्याचे सांगितले. तेव्हा तुम्ही सर्वांनी मला देशाच्या सभागृहात पाठवलात त्यामुळे मी तुमच्या सर्व मागण्या सभागृहात मांडून तुमच्या विहाराच्या विकासासाठी कंपाउंड वॉल आसेल किंवा पेवर ब्लॉक याच्यासाठी खासदार निधी किंवा शासनाकडून निधी उपलब्ध करून देतो असे आश्वासन दिले.यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ड. विजय गोणारकर यांनी रमाईचा इतिहास सांगताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रदेशात शिक्षणासाठी असताना गौऱ्या विकून कुटुंब चालवत बाबासाहेबांना पैशाची मदत करत असे कुटुंबातील कसलीच तक्रार न करता संसाराची सर्व जबाबदारी स्वतः उचलून कुटुंबाचा सांभाळ करायची तेव्हा भीमराव हे भीमराव होते पण त्यांना बाबासाहेब बनवण्याचे काम माता रमाईने केले आहे. असे मत प्रमुख वक्ते ड. विजयी गोणारकर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले यावेळी मंचावर पूज्य भदंत पय्याबोधी थेरो, ड. विजय गोणारकर, डॉ. करुणा जमदाडे, ज्येष्ठ नेते पी. एस. गवळे, बि.डी. कांबळे, संजय पाटील घोगरे, विठ्ठल गायकवाड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश सावते यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सुभेदार रामजी आंबेडकर बुद्ध विहार चॅरटेबल ट्रस्टचे अध्यक्ष गौतम भोळे, उपाध्यक्ष अशोक ढवळे, सचिव भगवान जमदाडे, चंद्रकांत लांडगे, प्रभाकर कांबळे, मायाबाई सोनकांबळे, विशाखा जमदाडे, गौतम जमदाडे, शोभाबाई चावरे, कबीरदास राक्षसे, भीमराव जमदाडे यासह समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

## अज्ञाताने हरबऱ्याच्या शेतीला लावली आग

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. १७ फेब्रुवारी**

बिलोली तालुक्यातील ग्राम थडीसावळी शेत शिवारातील कौलाने केलेल्या चार एकर जमिनीतील काढणीला आलेला हरभरा शेतात कापून गोळा करून ठेवलेल्या प्रचंड मोठ्या ढिगाऱ्यास रविवार दि.१६ रोजी पहाटेच्या वेळी अज्ञात इसमाने आग लावल्याने शेतकरी बालाजी लक्ष्मण कानगुलवार यांचे जवळपास तीन ते चार लाख रूपयांचे नुकसान झाले आहे. कौलाने केलेले हे शेत थडीसावळी येथील रहिवासी ज्योतीबाई अशोक पाटील यांच्या मालकीचे होते. त्यांनी गावातील शेतकरी बालाजी कानगुलवार यांस वर्षभरा पूर्वी कौलाने करण्यास शेती दिलेली होती.सदरील शेतकऱ्यांकडून त्या जमिनीत हरभरा पेरणी करण्यात आलेली होती.परिसरात हरभरा कापणी व खळ्यांची लगबग सुरू आहे.आपल्या कष्टाचे फळ घरात येण्यापूर्वीच अज्ञाताने आपला डाव साधला होता.गावातील लोकांनी घटनास्थळी धाव घेतली,मात्र आगीच्या लोळाने सारेच हतबल होते.

## मुदखेड शहरावर आता कॅमेऱ्याची करडी नजर



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १७ फेब्रुवारी**

मुदखेड शहरातील नागरिकांच्या सुरक्षतेसाठी सामाजिक कार्यकर्ते रामसिंग चव्हाण यांनी गुन्हेगारी तसेच अवैध धंदे यावर अंकुश ठेवण्यासाठी शहरातील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असून नागरिकांसाठी सुरक्षा कवच ठरला असल्याने नागरिकांतून या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.

**रामसिंग चव्हाण यांच्याकडून पोलीसांना ११ कॅमेरे भेट**

गेल्या अनेक वर्षांपासून रामसिंग चव्हाण यांच्या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकीचे उपक्रम शहरात राबविले जातात. मुदखेड शहरातील प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने गुन्हेगारी, अवैध धंदे, महिला व शालेय विध्यार्थी असुरक्षितता ,चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत होत्या. यामुळे नागरिकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. शहरात मुख्य ठिकाणी कॅमेरे नसल्याने घडत असलेल्या घटनांचा शोध घेणे कठीण झाले होते. रामसिंग चव्हाण यांनी अचूक नेम साधत सुरक्षा कवच साठी कॅमेरे शहरात बसवण्याची संकल्पना मांडली. या उपक्रमास पोलीस प्रशासनाने हिरवा कंदील दाखविला. यानंतर क्षणाचाही विलंब न लावता शहरातील प्रमुख ठिकाणी ११ कॅमेरे बसविण्यासाठी पोलिसांना भेट दिली.

शहरातील प्रमुख ठिकाणी कॅमेरे बसविण्यात येणार असल्याने आता यावर पोलिसांची करडी नजर राहणार आहे यामुळे अवैध धंदे, गुन्हेगारी, अन्याय व अत्याचार या बाबींना लगाम लागणार आहे. माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते रामसिंग चव्हाण यांच्या संकल्पनेतील सुरक्षा कवच कॅमेरे सेवालाल जयंतीचे औचित्य साधून पोलीस प्रशासनाला बहाल करण्यात आले आहे. यावेळी पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, सहाय्यक पोलिस निरिक्षक बी. आर. कांबळे, अमरभाऊ राजुरकर, यांची उपस्थीती होती. या उपक्रमामुळे आता नागरिकांचा ऐरणीवर असलेला असुरक्षिततेचा प्रश्न सुटला असून या उपक्रमामुळे दिलासा मिळाला आहे. या उपक्रमामुळे आता अनेक घटनांचा शोध लावणे सुलभ होणार असल्याचे पोलीस प्रशासनाने सांगितले. या उपक्रमाचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.

## नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी जनसेवेचे पारदर्शक काम करावे; जनतेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १७ फेब्रुवारी**

लोहा शहर हे वाढती लोकसंख्या असलेले शहर म्हणून नावारूपाला आले आहे. मुख्याधिकाऱ्याने जनतेचे कामे करुन कामात पारदर्शकता निर्माण करावी अशी चर्चा जनतेतुन ऐकायला मिळत आहे.

लोहा शहरात व ग्रामीण भागातील अनेक कुटुंबाचा लोंढा वाढत आहे. शहरात आजघडीला विविध भागात असुविधेचे जाळे पसरले आहे. जिल्ह्याच्या जवळचे शहर म्हणून अनेक कुटुंब कायम रहिवाशी होत आहेत परंतू भुमाफियांकडुन प्लॉटीगंचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात फोफावला असून काही ठिकाणी जनतेची फसवणूक केली जात आहे.

शासनाने झोन क्षेत्र पारित केले आहे. त्यामध्ये रेड झोन, ग्रिन झोन, एलो झोन , औद्योगिक वसाहत ,महाडासारख्या वसाहातीसाठी भुखंड आरक्षित करुन पुरग्रस्त भाग, सुनेगाव तलाव परिसर या भागात मानवी वस्तीचा समुह राहाण्यास हा परिसर योग्य नाही आशी शासन दप्तरी नोंद असतानाही काही भुमाफियांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून हे भुखंड खरेदी करून त्या भुखंडाचा एन.ए. करुन प्लॉटीगंचा व्यवसाय जोमात सुरू केला आहे याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

शहराच्या मध्यभागी लाईट चे पोल उभे केले आहेत. त्यावर आजुन दिवा पेटला नाही. सत्ता-सत्तांतर या घडामोडीने या कामाचा निधी परत गेला या गुत्तेदाराचा प्रश्न अजुनही निरूत्तरीत आहे. हा प्रश्न निकली काढून रस्त्यावरील दिवाबत्ती चालु करावी तसेच लिंबोटी धरणावरुन शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी योजना अनेक दिवसांपासून विस्कळीत आहे. याचा आढावा घेऊन शहराला लवकरात लवकर कायम पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पर्यंत करावा अशी मागणी होत आहे.

नगर पालिका इमारतीला रंगरंगोटी, सुशोभिकरण केले त्याचे आजपर्यंत देयके गुत्तेदाराला मिळाले नाहीत. या संदर्भात गुत्तेदारात नाराजी आहे. काही दिवसांनंतर नगर पालिकेला कुलूप लावण्याची नामुष्की येण्याची शक्यता नाकारता येत नाही.स्वच्छता विभागात अपुरे


## जाहीर प्रगटन

तमाम लोकांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की नांदेड जिल्ह्यातील विशेषतः नांदेड तालुका. जिल्हा नांदेड भागातील खरेदीखत दस्त क्रमांक १२६/२०१३ लिहून घेणार गयानंदा अशोक खंदारे वय ४९ वर्ष व्यवसाय घरकाम सदरील दस्त हा वाघाळा हद्दीत असून कर्ज प्रकरणांमध्ये इक्विटास स्मॉल फायनान्स बँकेकडे इक्विटेबल मोर्टगेज साठी गहाण ठेवण्यात आला आहे. सदरील प्रॉपर्टी मध्ये जर कोणाला उपरोक्त क्लेश किंवा द्वेष आढळून आल्यास त्यांनी ॲड. गजानन खानगुंडे मोबाईल नंबर ९९२३६०४६९० यांना संपर्क साधावा जाहीर प्रगटन देणार.

**अशीलातर्फे ॲड. गजानन खानगुंडे, वजीराबाद, नांदेड.**
**तालुका जिल्हा नांदेड.**
**मो. नं. ९९२३६०४६९०**

Made with Xodo PDF Reader and Editor



# शेतकऱ्यांच्या पीक विम्यासाठी किसान सभेचे धरणे



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ फेब्रुवारी**

२०२४ खरिप व रब्बी पिकविमा जोपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत नाही तोपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन सुरूच राहणार असे म्हणत शेकडो शेतकऱ्यांनी जालना रोडवरील भारतीय कृषी विमा कंपनीच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहेत. सदरच्या आंदोलनाचं नेतृत्व महाराष्ट्र राज्य किसान सभा बीडच्या वतीने करण्यात येत आहे. बीड शहरातल्या जालना रोडवर असलेल्या भारतीय कृषी विमा कंपनीच्या कार्यालयासमोर हजारो शेतकऱ्यांनी ठिय्या मांडत धरणे आंदोलनाला सुरूवात केली आहे.

# दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ फेब्रुवारी**

बीड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना स्थानिक ठिकाणी रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरिता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, बीड मार्फत दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण पॉलीटेकनिक कॉलेज बार्शी रोड बीड येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सदर मेळाव्यामध्ये पुढिलप्रमाणे नांमाकित कंपनीच्या वतीने बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी याकरिता मुलाखती घेण्यात येणार आहेत.

१) ब्रिजयोग टोयोटा बीड येथे सुपरवायजर/सेल्स रिप्रेजेंटेटिव्ह एकूण पदे १०, शैक्षणिक पात्रता १२ वी/पदवी, वयोमर्यादा-१८ ते ३०

२) एस. जी. सॉप्टवेअर सोल्युशन बीड येथे मार्केट डेव्हलपमेंट इक्झिक्युटिव्ह एकूण पदे १०, शैक्षणिक पात्रता- १२ वी/पदवी, (वयोमर्यादा-१८ ते २४)

३) बजाज टो लि. संभाजीनगर येथे डि.टी.ई. एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग/पदवी, वयोमर्यादा-१८ ते २४

४) पर्किन्स इंडिया लि संभाजीनगर येथे डि.टी.ई. एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग/पदवी, वयोमर्यादा-१८ ते २४

५) डायनॅमिक कन्सलटन्सी पुणे येथे सेल्स रिप्रेजेंटेटिव्ह/क्यॉलिटी इंजिनिअर एकूण पदे ४०, शैक्षणिक पात्रता डिप्लोमा इन सव्हिल इंजिनिअरींग/१० वी/१२ वी/पदवी/एम.बी.ए वयोमर्यादा-१८ ते २४

६) कोलब्रो ग्रुप नागपूर सर्वेअर एकूण पदे ३०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन सव्हिल इंजिनिअरींग पदवी, वयोमर्यादा-१८ ते २४

७) क्रेडिट क्सेस केंद्र मॅनेजर एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- १२ वी / पदवी, वयोमर्यादा-१८ ते २९

८) गोंविदाज एच. आर. नाशिक ट्रेनी एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता १२ वी/पदवी, वयोमर्यादा-१८ ते ३०

९) जॉन डेअर लि पुणे ट्रेनी इंजिनिअर एकूण पदे ५०, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग, वयोमर्यादा-१८ ते २२

१०) ब्रम्ह प्रिसिशिअन मटेरिअल संभाजी नगर येथे क्वॉलिटी इंजिनिअर एकूण पदे १५, शैक्षणिक पात्रता- डिप्लोमा इन इंजिनिअरींग, वयोमर्यादा-१८ ते २२

रोजगार मेळाव्यात सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांनी पुढीलप्रमाणे सहभागी व्हावे

सर्वप्रथम नोकरी इच्छुक उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबसाईटवर नोकरी साधक Job seeker म्हणून नोंदणी करुन आपल्या युजरनेम व पासवर्डचा वापर करुन डेस्कळप बटनावर क्लिक करावे. प्रोफाईल मधील प व पंडित दीनदयाळ उपाध्याय, रोजगार मेळावा-०३ या लिंक वर क्लिक करुन रोजगार मेळाव्याचा बीड जिल्हा निवडून Filter बटनावर क्लिक करावे. आपल्याला बीड- पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा-०३ दिसु लागेल. त्यातील action या पर्यायाखालील दोन बटना पैकी पहिल्या बटनावर क्लिक केल्यास मेळाव्याची माहिती दिसेल. आपला रोजगार मेळाव्यामध्ये ऑनलाईन सहभाग नोंदवला जाईल. याबाबत बीड जिल्हयातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करावे व त्याच बरोबर दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण पॉलीटेकनिक कॉलेज बार्शी रोड बीड येथे प्रत्यक्ष मुलाखतीस येऊन संधीचा लाभ घ्यावा. रोजगार मेळाव्यास येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी. या बाबत काही अडचणी असल्यास या कार्यालयाचा दुरध्वनी कं.०२४४२-२९९११६ आणि श्री. इंगोले यांना ९८२२७८१८७६ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच Beed Skill या फेसबुक पेजला फॉलो व लाईक करावे असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुशिल उचले, यांनी केले आहे.

# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार, २०२३-२४ प्राथमिक छाननी गुणांकन प्रसिद्ध करणे आणि सूचना व हरकती मागविणे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ फेब्रुवारी**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाद्वारा राज्यातील सर्वोत्कृष्ट क्रीडापटूंना व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना क्रीडा विभागाचा प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यासाठीचे गुणांकन प्रसिद्ध करण्यात आले असून यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत.

क्रीडा क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणार्या ज्येष्ठ क्रीडा महर्षिकरीता जीवन गौरव पुरस्कार, क्रीडा मार्गदर्शकांकरीता उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (साहसी उपक्रम), शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (दिव्यांग खेळाडू) व जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शक) असे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासनाने दि. २९ डिसेंबर, २०२३ व दि.२५ जानेवारी २०२४ अन्वये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली, २०२३ विहीत केली आहे. या नियमावलीनुसार सन २०२३-२४ या वर्षाच्या पुरस्कारासाठी राज्यातील क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी उपक्रमात सहभागी झालेले खेळाडू/व्यक्ती यांच्याद्वारा दि. १४ जानेवारी ते २६ जानेवारी, २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जाची प्राथमिक छाननी करण्यात आलेली असून, प्राथमिक छाननीचे गुणांकन तक्ते शासन निर्णय क्र. शिछपु. २०२३/ प्र.क्र.१८८/क्रीयुसे-२ दि. २९ डिसेंबर, २०२३ मधील नियम क्र.१.१९, नियम क्र.१.२०, नियम क्र.१.२१ अन्वये https://shivchhtrapatiawards.com या लिंकवर एकूण गुणांकनासह दि.१५ ते १८ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीसाठी सूचना व हरकतींसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

प्राथमिक छाननी अहवाल हे अंतिम नसून, त्यामध्ये आपल्या सूचना व हरकतींनुसार बदल होऊ शकतो, तसेच सूचना/हरकतीनंतर सदरचा अहवाल पुनश्च प्रसिद्ध करण्यात येणार नाही. प्राथमिक छाननी अहवालात केलेल्या पुरस्कार गुणांकनाबाबत कांही आक्षेप किंवा सूचना असतील तर त्या सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात desk14.dsys-mhgov.in या ई-मेल आय.डी.वर सादर कराव्यात. विहीत नमूना या टिप्पणीच्या पृष्ठ क्र. २ वर दिलेला आहे.या विहीत नमुन्यामध्ये पुरस्कारासाठी ऑनलाईन सूचना व हरकती सादर करण्याचे वेळापत्रक :

सूचना व हरकती सादर करण्याचा सुरुवातीचा दिनांक : १५ फेब्रुवारी,२०२५ सूचना व हरकती सादर करण्याचा अंतिम दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५ सायं ०५.०० पर्यंत पुरस्कार गुणांकन तक्ते अवलोकनासाठी व सूचना/ हरकती सादर करण्यासाठी ऑनलाईन लिंक : https://shivchhatrapatiawards.com ही आहे. अधिक माहितीसाठी अनिकेत काळे (क्रीडा अधिकारी) ९६०४९५९६७८ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# वाघोरा जि.प.शाळेने फाल्गुन काष्टेचे केले अभिनंदन



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ फेब्रुवारी**

तालुक्यातील वाघोरा जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी तथा गावचे सुपुत्र फाल्गुन काष्टे हे एमपीएससी द्वारे मंत्रालयात क्लर्कपदी नियुक्ती करण्यात आली म्हणून यांचे दि.१७ सोमवार रोजी शाळेचे मुख्याध्यापक, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपस्थित सर्व शिक्षकांनी मोठ्या उत्साहात अभिनंदन केले.

कार्यक्रमाची सुरुवात परिपाठ झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांच्या समक्ष शाळेच्या प्रणांगणामध्ये सकाळी दहा वाजता झाली. मोठ्या उत्साहामध्ये अभिनंदन सत्कार करण्यात आला सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती फाल्गुन काष्टे म्हणाले विद्यार्थ्यांनी योग्य वेळी योग्य अभ्यास केला पाहिजे म्हणजे जीवनात यशस्वी होता येईल. मला यश मिळवण्यासाठी जो उशीर झाला तो तुम्हाला होणार नाही. कार्यक्रमाचे अध्यक्ष शरद कुलकर्णी म्हणाले हे आमच्या शाळेचे आदर्श विद्यार्थी होते. व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आरुण बादाडे म्हणाले विद्यार्थ्यांनी यांची प्रेरणा घ्यावी हे उद्गार होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक केशव बादाडे यांनी केले, वाघोरा गावामध्ये रात्री आठ ते दहा च्या दरम्यान भव्य मिरवणुकीमध्ये त्यांचा स्वागत सत्कार व माता-भगिनींनी ओवाळणी करून शुभाशीर्वाद दिले. कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य केतन बादाडे उपस्थित होते. विद्यार्थी व सर्व उपस्थितचे आभार बबन पोटे सर यांनी मानले.

# पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करून द्या-गिरी,धुरंधरे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१७ फेब्रुवारी**



देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांची महत्त्वकाक्षी पंतप्रधान आवास योजनेंतर्गत गेवराई नगरपालिकेकडून शहरातील संजयनगर, साठेनगर,संघमित्र नगर, येथील अतिक्रमण धारकांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलाच्या बांधकामास परवाने देण्यात आलेल्या लाभार्थींना शासन निर्णयानुसार एका लाभार्थीस

पाच ब्रास वाळु मोफत देण्याचा शासन निर्णय झालेला आहे त्या त्या निर्णयानुसार गेवराई नगरपालिकेने संजयनगर साठेनगर संघमित्र नगर येथील लाभार्थींना सद्यस्थितीत वाळु मिळत नाही त्यामुळे अनेकांच्या घरांचे काम सुरूच झालेले नाहीत तरी तहसीलदार साहेबानी वाळु उपलब्ध करून नागरिकांची गैरसोय दुर करण्यासाठी शासन निर्णयांची अंमलबजावणी करुन पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांची महत्त्वकाक्षी पंतप्रधान आवास अःऑयोजना यशस्वी करण्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी विनंती नागरिकांसह मा.नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब यांनी ना. तहसीलदार सोनवणे यांच्या कडे निवेदनद्वारे केली आहे

गेवराई नगरपालिकेकडून शहरातील संजयनगर साठेनगर मधील अतिक्रमण धारकांना मा.आ.लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुर झालेले आहेत पण आजच्या परिस्थितीत गेवराईत वाळु मिळत नाही त्यामुळे गोरगरीब जनतेला बेभाव वाळु घेणे शक्य नाही तरी पंतप्रधानाची महत्वकांशी पंतप्रधान आवास योजना यशस्वी करण्यासाठी सरकारने शासन निर्णयानुसार एक घरकुलासाठी ५ ब्रास वाळु द्यावी असा निर्णय सरकारने घेतला होता त्यांची अंमलबजावणी करुन संजयनगर,साठेनगर, येथील गोरगरीब नागरिकांना सहकार्य करावे असे तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे यावेळी मा. नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,मा.नगरसेवक राम पवार, शेख निजाम, लक्ष्मण चव्हाण, पिटु साळवे, शेख ईर्शाद,दिलीप सोनवणे, अनिल खांडेकर, राणा कानाडे, शेख जहीर, शेख मुददशीर, शेख बाबा, आकाश खाजेकर, बाळराजे थोरात, राम लिबोरे, राजेंद्र तापडीया,कृष्णा सोलकर,बंडु रोकडे, साईनाथ पाटुळे , प्रभु सुतार, आदी उपस्थित होते

# श्री गुरुपादुका मठ चनई च्या वतीने महाशिवरात्री निमित्ताने शिवलिलामृत पारायण सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ फेब्रुवारी**

अंबाजोगाई येथील श्री गुरुपादुका मठ(मंदिर) च्या वतीने महाशिवरात्री च्या निमित्ताने शिवलिलामृत या ग्रंथाच्या पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे.हे पारायण बुधवार दि.१९/०२/२०२५ ते २६/०२/२०२५ पर्यंत असणार आहे.या सप्ताह पारायण काळात त्रिकाळ आरती स.७,दु.१२.सायं.६ वाजता असणार आहे.याशिवाय या सप्ताह काळात रूद्र याग व केदारनाथ महाराजांना रूद्राभिषेक होणार असणार आहेत.

ज्यांच्याकडे ग्रंथ उपलब्ध नसेल त्यांना ग्रंथ तिथे उपलब्ध करून देण्यात येईल.हे पारायण श्री गुरुपादुका मठ (मंदिर), सिध्दीविनायक कॉलनी,चनई येथे होणार असून या सेवेत जास्तीत जास्त सेवेक-यांनी सहभागी व्हावे असे आवाहन मठाच्या परमपूज्य गुरूवर्य श्री.समीर(दादा) भास्करे, प्रवीण बासटवार,शिंदे काका,पंडीत काका, अनिकेत पवार,गोपाल खांडेकर,रोहन गडदे श्रध्दा भास्करे,संगीता सौदागर,मिना कदम,जान्हवी पतंगे,सिता गडदे, यांनी केले आहे.

# पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात इ.१०वी वर्गाचा शुभेच्छा समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ फेब्रुवारी**



पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या इ.१०वी वर्गाचा 'शुभेच्छा समारंभ' दि.१७ फेब्रुवारी २०२५ सोमवार रोजी उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून १०वी प्रमुख विष्णू तेलंगे उपस्थित होते.सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर आणि देवी सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी विद्यार्थी मनोगतात इ.१०वीतील कु.सुप्रिया साळवे,अक्षता थोरात,अक्षता साळुंके,प्रिया वाघमारे,प्रीती सोळंके,निशिगंधा निकम,चि. विश्वजित निकम,सलमान शेख,साजिद शेख,गजानन पांचाळ,प्रणव वाघमारे,ओमकार कल्याणी यांनी विद्यार्थी जीवनातील एक टप्पा पूर्ण केल्याचा आनंद आणि या काळातील विविध क्षणांना पारखं झालो याचे दुःख व्यक्त केले.तसेच कु.वैष्णवी गुळवे हिने सादर केलेल्या 'का कळेना अशी हरवली पाखरे' या गीताने सर्वांना याप्रसंगी अंतर्मुख केले.

शिक्षक मनोगतात ज्ञानेश मातेकर यांनी आपल्या मनातील विद्यार्थ्यांच्या हृदय आठवणींना उजाळा दिला. प्रमुख मार्गदर्शक तेलंगे यांनी १०वी नंतर पुढे काय? याबाबत मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना म्हणाले की,नव्या युगात झेप घेताना प्रत्येकाला 'स्व' ची ओळख करून घेणे महत्त्वाचे आहे.भविष्याचा वेध घेताना ध्येय प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये ध्यास,नियोजन,योग, स्वाध्याय इ.मूल्यांची रुजवणूक करून घेणे आवश्यक आहे असे विचार मांडून त्यांनी सर्वांना पुढील काळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.तसेच१०वी वर्गाचा निकाल उंचावण्यासाठी शाळेच्या वतीने करण्यात आलेले विविध प्रयत्न याचा आढावा घेतला.

अध्यक्षीय समारोपात मार्गदर्शन करताना संजयराव विभूते यांनी शाळेने दिलेल्या संस्काररूपी शिदोरीच्या आधारे विद्यार्थ्यांनी समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करावी.तसेच पुढील परीक्षेला सर्वांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे असे आवाहन केले.सर्व १०वीच्या विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या निधीतून शाळेप्रती ऋण व्यक्त करत विद्यालयास शालेय कामकाजासाठी मोठा टेबल भेट दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश मातेकर,वैयक्तिक पद्य कु.नेहा वाघमारे ,प्रास्ताविक व परिचय नितीन चौधरी तर आभार प्रदर्शन राकेश मोरे यांनी केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता शांती मंत्राने करण्यात आली.

# आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये निकिता थावरे, पलक डोंगरे, दिव्या कुंभार यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ फेब्रुवारी**



दि. १७ ते २२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या निकिता थावरे, पलक डोंगरे,दिव्या कुंभार या तीन खेळाडूंची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल संघामध्ये निवड झाली आहे, पुढे हे खेळाडू गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत, या खेळाडूंनी आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी केल्यामुळे यांची निवड विद्यापीठाच्या संघामध्ये झाली आहे, हे खेळाडू सातत्याने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या व्हॉलीबॉल मैदानावरती सराव करतात.

या यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा.सी.डी. फड यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, अॅड.बी.आर. डक, सत्यप्रकाश रुद्रवार,डॉ बी. एल. चव्हाण, निळकंठ साबळे, डॉ. सुनील गरड, श्री. वगरे नाना , प्राचार्य डॉ.जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ.एन.के. मुळे, डॉ.एम.ए. कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे,पर्यवेक्षक प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. स्वप्नील टाक ,प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे, प्रा. सुदर्शन स्वामी , एकनाथ मस्के आदींसह महाविद्यालयाचे कर्मचारी व पालकवर्गाने अभिनंदन केले आहे.

Made with Xodo PDF Reader and Editor



# शिक्षण विभागाचा शिक्षकांवरच भरोसा नाय काय?

## केंद्रसंचालक,पर्यवेक्षक बदली मुळे सर्वत्र नाराजी, --जिल्ह्यात ४२ केंद्रांची अदलाबदली

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-:** दि २१ फेब्रुवारी पासून सुरू होत असलेल्या दहावीच्या परीक्षेचे नियोजन प्रशासनाकडून सुरू झाले आहे.यामध्ये कॉप्यांना आला घालण्यासाठी अनेक ठिकाणी केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदली करण्यात आले आहेत.परंतु यामध्ये अनेक शाळा या किरकोळ प्रकार किंवा काही गोंधळ नसतांनाही केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलण्यात आल्याने शिक्षकांसह मुख्याध्यापकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शिक्षण विभागाचा शिक्षकांवरच भरोसा नाय काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे. राज्यभरात कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले जात आहे.परंतु यामध्ये शिक्षक व मुख्याध्यापक भरडले जात असल्याचे चित्र आहे.सेलू तालुक्यात शहरी भागात अतिशय कडकपणे परीक्षा घेण्यात येतात.परंतु छोट्या छोट्या कारणांचा आधार घेऊन केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलले जात आहेत.कारण कोणताही शिक्षक कॉप्यांना प्रोत्साहन देऊ शकत नाही.त्यातच ज्या केंद्रावर अनेकवेळा कॉप्याचे प्रकार घडलेत अशा केंद्रावर बदल करणे संयुक्तिक आहे.परंतु क्षुल्लक कारणावरून केंद्रसंचालक बदलणे यामुळे नाराजी पसरत आहे. कमीतकमी केंद्रसंचालक तरी त्या त्या शाळेवर ठेवणे आवश्यक आहे.कारण केंद्रसंचालक बदलल्यास नवीन शाळेतील भौतिक सुविधा,सुरक्षा व्यवस्था याची माहिती नसते.यामुळे केंद्रसंचालकांना त्रास होण्याची शक्यता आहे.अतिशय कडकपणे परीक्षा घेत आहोत असा अविर्भाव आणत असतांना मुख्याध्यापकांच्या समोर येणाऱ्या समस्यांचा विचार त्र केलेला दिसत नाही.परीक्षा काळात केंद्रसंचालक,पर्यवेक्षक बदल्यांच्या निर्णयाला शिक्षक संघटनांनी देखील विरोध केला परंतु प्रशासनाने त्र आपलाच होरा कायम ठेवल्याने नाराजी पसरत . आज दि १५ फेब्रुवारी रोजी दहावीच्या परीक्षेचे साहित्य वाटपासाठी येथील शिवाजी महाविद्यालयात झालेल्या केंद्रसंचालकांच्या बैठकीत शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसह बोर्डाचे अधिकारी सुद्धा उपस्थित होते.या बैठकीत देखील काहींनी आपली समस्या मांडली.परंतु बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी थेट मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचा व राज्य मंडळाच्या आदेशांचा संदर्भ देत केंद्रसंचालकांना कडक सूचना केल्या.तसेच प्रेमाने सांगण्याऐवजी कारवाईचेच जास्त उदाहरणे दिले.तसेच केंद्रसंचालकांच्या कुठल्याही तक्रारी एकूण घेतल्या जाणार नसून संबंधित केंद्राची सर्व जबाबदारी केंद्रसंचालकांची असल्याच्या सूचना दिल्या. परभणी जिल्ह्यात एकूण ४२ केंद्राचे केंद्रसंचालक व पर्यवेक्षक बदलण्यात आले .

**ससाणेंच्या बोलण्यात टी एन शेषन यांचा उल्लेख या बैठकीत केंद्रसंचालकांना सूचना देतांना कडक अधिकारी म्हणून प्रसिद्ध असलेले योजना शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांनी आपल्या बोलण्यात ३ ते ४ वेळा दिवंगत निवडणूक आयुक्त टी एन शेषन यांच्या कार्यपद्धतीचा व नावाचा उल्लेख केला.टी एन शेषन यांनी जसे कडकपणे काम केले तसे काम केंद्रसंचालकांनी करावे असेही त्यांनी सांगितले.तसेच कायद्यातील सूचनांची उजळणी करून केंद्रसंचालकांनी जबाबदारीने काम करण्याच्या सूचना दिल्या.**

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हयातील पिंगळी-ताडलिमला वझुर रावराजुर मरडसगाव पूलाचे काम करावे

**परभणी ,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पिंगळी-ताडलिमला-वझुर-रावराजुर-मरडसगाव प्रजिमा ३५ गोदावरी नदीवरील रखडलेल्या पुलाचे काम त्वरीत सुरु करावे, अशी मागणी वझूर परिसरातील ग्रामस्थांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली .

लक्ष्मणराव पवार, डॉ. केदार खटींग, अॅड. अशोकराव शिंदे, प्रल्हाद पवार, गोपाळराव पवार, निलेश पवार यांच्यासह अन्य ग्रामस्थांनी पालकमंत्री बोर्डीकर यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, वझुर (ता.पुर्णा) व रावराजुर (ता. पालम) दोन्ही गावच्या मध्यभागातून गोदावरी नदीच्या पात्रात पुलाचे काम चालु . ६ मार्च २०१९ रोजी कार्यारंभ आदेश होऊन ४ वर्षाहुन अधिक काळ उलटला आहे अद्याप काम पुर्ण झाले नसुन पुलाअभावी ग्रामस्थांचे अतोनात नुकसान होत आहे व अनेक अडचनींना सामोरे जावे लागत . हा पूल १९५४ नागपूर प्लाननुसार मंजुर . परभणी २२२ (नवीन ६१) ते लातुर राष्ट्रीय महामार्ग १६१ होणार असून यामुळे दोन जिल्हयातील ४८ किमी अंतर कमी होणार . गंगाखेड, परळी, अंबाजोगाई शहर ओलांडून वाहतूक कोंडीमुळे लागणारा वेळ बचत होईल. या मार्गीने अंतर अंदाजे १६५ किमी . या तुलनेत त्रिधारा येथून पिंगळी, वझुर, रावराजुर, मरडसगाव, बनवस, माळेगाव, अहमदपुरमार्गे लातुर ११७ कि.मी. अंतर आहे यामुळे इंधनासहित वेळेची बचत होईल. आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्य सीमा जवळ पडतील.तसेच या मार्गावर १०० हुन अधिक गावे वाहतुक होऊन दळणवळण सोयीस्कर होईल व उद्योगधंदे शेतीला पुरक व्यवसाय, मुख्य बाजारपेठ, शेतमाल खरेदीविक्रीसाठी सोयीस्कर होऊ शकते, असे या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले.

पिंगळी (बा) पद्मावती वझुर व बनवस या मार्गावर परभणी जिल्हा प्राचीन ऐतिहासिक वारसा स्थळ, तीर्थक्षेत्र ज्यामध्ये प्राचीन मंदिरे असुन स्थापत्यकला, मूर्तीकला, वास्तुकला पाहायला मिळतात. पर्यटनाला चालना, ऐतिहासिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, कृषी पर्यटन, शैक्षणिक पर्यटन होऊ शकते. या पुलाचे काम पूर्ण झाल्यास डिग्रस बंधाऱ्यात पाणी साठवणुक क्षमतेच्या १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध होईल, अशी अपेक्षाही या निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली.

### जिल्हाधिकारी कार्यालयावर उद्या शेतकऱ्यांचा मोर्चा

**परभणी,/प्रतिनिधी :** पिकविम्याच्या मागणीसाठी मंगळवारी (दि.१८) सकाळी ११ वाजता शेतकऱ्यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार .

जिल्ह्यातील ५२ महसूल मंडळातील लाखो शेतकऱ्यांचा खरीप २०२४ सोयाबीन, तूर, कापूस आदी पिकांचा अग्रीम, वैयक्तिक तक्रारी व इतर ५०० कोटी रुपयाचा पिक विमा आयसीसीआय लोम्बार्ड कंपनीकडे थकीत . पाठपुरावा करून सुद्धा पिक विमा कंपनी शेतकऱ्यांना दाद देत नसल्याच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात येणार . डॉ. सुभाष कदम, हेमचंद्र शिंदे, विश्वंभर गोरवे, गोविंद लांडगे यांच्या नेतृत्वाखाली मोंढा मार्केट कमिटीपासून या मोर्चास प्रारंभ होणार असून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार . मोर्चात शेकडो शेतकरी सहभागी होणार . मोर्चाच्या तयारीसाठी चळवळीतील कार्यकर्ते गावोगावी शेतकऱ्यांना भेटी देऊन मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन करत .

जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा खरीप हंगाम २०२४ मधील थकीत २५ टक्के अग्रीम पिक विमा, स्थानिक आपत्तीतील नुकसान भरपाई, काढणी पश्चात नुकसान भरपाई आणि पीक कापणी प्रयोग आधारित नुकसान भरपाई मिळावी. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२४ मध्ये उत्पादित केलेले सर्व सोयाबीन एमएसपी नुसार खरेदी करण्यात यावे. शेतकऱ्यांचा पिक विमा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या आयसीआयसीआय लोम्बार्ड पिक विमा कंपनीवर गुन्हे दाखल करून काळ्या यादीत टाकण्यात यावे आदी मागण्या मोर्चाद्वारे करण्यात येणार .

### कार आणि ट्रॅक्टर धडकेत युवकाचा मृत्यू

**पूर्णा,/प्रतिनिधी :** झिरोफाटा ते वसमत या महामार्गावर शनिवारी (दि.१५) सकाळी साडेपाच ते सहा वाजेच्या दरम्यान आरळ शिवारात ऊस घेवून जाणारा ट्रॅक्टर व कार या दोन वाहनांच्या धडकेत पूर्णा येथील सय्यद खाजा सय्यद अली (वय २८ रा. एकबाल नगर) या युवकाचा मृत्यू झाला.

एम.एच.१४ एफ.सी. २२७५ या स्विफ्ट डिझायर कारने ऊसाने भरलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला जोरदार धडक दिली. त्यात कार चक्काचूर झाली व या युवकाच्या शरिरासह डोक्यास मोठा मार लागल्याने त्यात तो गंभीर जखमी झाला. त्यास परभणी येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुर्दैवाने डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## सेलूत सामान्यज्ञान परीक्षेला मोठा प्रतिसाद

### दोन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**सेलू,/प्रतिनिधी :** येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने त्र शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त शिवाजी राजांच्या जिवन चरित्रावर आधारीत रविवारी १६ फेब्रुवारीरोजी आयोजित तालुकास्तरीय सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षेत तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालयातील दोन हजार विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त व मिळाला.

येथील नूतन विद्यालय व केशवराज बाबासाहेब विद्यालयात ५ वी ते ६ वी, ७ वी ते ८ वी व ९ वी ते १२ वी अशा तीन गटात आयोजित सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा यशस्वीपणे पार पडल्या. परीक्षा यशस्वी करण्यासाठी केंद्र संचालक म्हणून विलास खरात, रामराव गायकवाड, किरण जाधव , तानाजी भोसले, रामराव बोबडे यांनी काम पाहिले. तालुक्यातील विविध शाळांमधील १०० शिक्षकांनी पर्यवेक्षक म्हणून उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. स्पर्धा परीक्षा यशस्वीतेसाठी समितीचे अध्यक्ष गोविंद काष्टे, उपाध्यक्ष अप्पूसेठ सोळंके, सचिव रामेश्वर शेरे, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, मुख्याध्यापक सर्जेराव लहाने, रोहीदास मोगल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशांत देशमुख, आत्माराम हारकळ, सुरेश कवडे, गणेश माळवे, सुभाष मोहकरे, किरण खरात, नरेश पाटील, योगेश ढवारे , सर्जेराव सोळंके, रणजीत गायके, दत्तात्रय यादव, सिध्देश्वर मुरकुटे , बाबासाहेब काष्टे, मुकुंद सोळंके आदींनी परिश्रम घेतले. विजेत्या स्पर्धकांना १९ फेब्रुवारी शिवजयंतीदिनी रोख पारितोषिके , सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार .



## पुस्तके ही मानवी जीवनाचा प्रभावी उर्जास्त्रोत- जेष्ठ कवी केशव वसेकर




**परभणी,/प्रतिनिधी-** पुस्तके ही माणसाला मानवी जीवनामध्ये उर्जा प्रदान करण्याचे काम करतात. पुस्तक वाचनामुळे माणूस बोलका होतो. जग बदल्याची शक्ती पुस्तकामध्ये असते. पुस्तके आणि ग्रंथ माणसाला निष्ठा, इमानदारीने जगण्याचे तत्व शिकवतात, त्यामुळे प्रत्येकाने वाचनसंस्कृती ही जोपासलीच पाहिजे, असे आवाहन जेष्ठ कवी केशव वसेकर यांनी केले. जिल्हाग्रंथालयकार्यालयाच्यावतीने परभणी शहरातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित परभणी ग्रंथोत्सव-२०२४ चे उद्घाटन आज सुप्रसिध्द जेष्ठ कवी केशव वसेकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक (छत्रपती संभाजीनगर) सुनिल हुसे . यावेळी उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, जिल्हा कोषागार अधिकारी निळकंठ पाचंगे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी बाळासाहेब देवणे, परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष जिवन लोखंडे, कथाकार राजेंद्र गहाळ, केंद्रीय महाविद्यालयाचे प्राचार्य राहूल नितनवरे, प्राचार्य रामेश्वर पवार उपस्थित . श्री. वसेकर म्हणाले की, पुस्तक हे आपल्या मानवी जीवनाचे चार्जर असून ते माणसाला चार्ज करतात. पुस्तके मानवाच्या ज्ञानात भर घालतात. पुस्तकांमुळे मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे माणसाला अन्यायाविरुध्द लढण्याची प्रेरणा मिळते. पुस्तके खांबावरील तारे सारखी असतात, जसे की तारांना स्पर्श केल्याशिवाय त्यामधील विजेच्या प्रवाहाची जाणीव होत नाही. त्याप्रमाणे पुस्तके वाचल्याशिवाय त्यांची शक्ती कळत नाही. पुस्तके माणसाला जगण्याची प्रेरणा देते. पुस्तके माणसाला बोलके करतात. तसेच मानसाला निष्ठा व इमानदारी शिकवतात. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून आजच्या मोबाईलच्या युगात वाचनसंस्कृती जोपासली जात . त्याच लाभ सर्वांनी अवश्य घ्यावा. उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात ग्रंथोत्सवासारखे कार्यक्रम होणे आवश्यक . सध्याच्या सोशल मिडीयाच्या युगात माणसाला ग्रंथाशिवाय पर्याय नाही. समाजात वाचन चळवळ वाढावी यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. श्री. हुसे म्हणाले की, वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे प्रत्येक जिल्ह्यात आयोजन करण्यात येत . वाचन संस्कृती वृद्धींगत करणे हा ग्रंथोत्सव आयोजनामागचा हेतू . नव्या पिढीला मोबाईलच्या निरर्थक गोष्टीतून बाहेर काढण्यासाठी ग्रंथांकडे वळविणे आवश्यक . ग्रंथ जीवनाचे अविभाज्य अंग असून सर्वांनी अवांतर वाचन करावे. प्राचार्य रामेश्वर पवार म्हणाले की, स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी ग्रामीण भागातील वाचनालयाचा महत्वाचा सहभाग . या माध्यमातून युवकांनी ज्ञान संपादन करुन आपले भविष्य उज्वल करावे. कथाकार राजेंद्र गहाळ यांनी ग्रंथालये ही वाचकांची ज्ञानाची भूक भागवत असतात. वाचन संस्कृती महत्वाची असून तरुण पिढींनी वाचनाकडे वळले पाहिजे. प्रास्ताविक श्री. देवणे यांनी केले, राधाकिशन कदम यांनी आभार मानले. प्रारंभी ग्रंथ प्रदर्शन व विक्री दालनांचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांच्या हस्ते झाले. याठिकाणी उभारण्यात आलेल्या प्रकाशनांच्या दालनांमध्ये विविध विषयांवरील ग्रंथ, पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध . उद्या मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळपर्यंत हे ग्रंथ प्रदर्शन व विक्री सुरु राहणार . कार्यक्रमास जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे पदाधिकारी, ग्रंथपाल, वाचन प्रेमी, विद्यार्थी उपस्थित . ग्रंथदिंडीला परभणीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनापूर्वी सकाळी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन करण्यात आले. राजगोपालचारी उद्यान परिसरातून निघालेल्या या दिंडीचा समारोप जिल्हा ग्रंथालय कार्यालय येथे झाला.




**परभणी- छत्रपती संभाजीनगर येथे १३ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२५ दर्म्यान श्री त्र शिवचरित्र पारायण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे त्या कार्यक्रमातील दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ चे काही क्षणचित्रे. कार्यक्रमात आयोजक तथा वाचा शिवचरित्र छत्रपतीचे लेखक प्रा चंद्रकांत भराट, मराठा प्रवाह समन्वय समितीचे प्रदेशाध्यक्ष धाराजी भुसारे सह इतर पदाधिकारी दिसत आहेत.**

## व्हाईस ऑफ मीडिया : सेलू तालुकाध्यक्षपदी शिवाजी आकात, मोहन बोराडे सचिव

### नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड





**सेलू,/प्रतिनिधी:** ० व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेची २०२५-२६ या वर्षातील नूतन कार्यकारिणी निवडीसाठी रविवारी, १६ फेब्रुवारी रोजी तालुकाध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी संघटनेच्या सभासदांची बैठक पार पडली. यामध्ये सेलू तालुकाध्यक्षपदी शिवाजी आकात यांची, तर सचिवपदी मोहन बोराडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची व नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

नूतन कार्यकारिणी या प्रमाणे : अध्यक्ष : शिवाजी आकात, सचिव : मोहन बोराडे, उपाध्यक्ष : पंकज सोनी, कार्याध्यक्ष : बाबासाहेब हेलसकर, कोषाध्यक्ष : संतोष कुलकर्णी, सहसचिव : बालाजी सोनवणे, संघटक : श्रीपाद कुलकर्णी, प्रसिध्दी प्रमुख : प्रताप काकडे, कार्यवाहक : शिवप्रसाद काबरा मार्गदर्शक सदस्य : राम सोनवणे, नारायण पाटील, अशोक अंभोरे,डाँ.विलास मोरे, जयचंद खोना, प्रसाद खारकर,सचिन हिवरे, शंभू काकडे, लक्ष्मण सोन्ने आदी उपस्थित होते.

# परभणी येथे वन विभागीय कार्यालय तात्काळ सुरु करा-राठोड नाईक

**जिंतूर,/प्रतिनिधी-** राज्यमंत्री तथा पालकमंत्री परभणी सौ मेघनादीदी बोर्डीकर साकोरे आज १३ फेबु २०२५ रोजी जिंतुर येथे नागरिकांचे प्रश्न व विकासाबाबत चर्चा करण्यासाठी उपस्थित होत्या.

महसूल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २५ मे २०२३ अन्वे वन विभागातील स्वतंत्र उपवन विभागाचे लगतच्या वनविभागांमध्ये समायोजन करण्यात आलेले असून त्यानुसार मालेगाव संगमनेर परभणी व भोर हे स्वतंत्र उपवन विभाग अनुक्रमे पूर्व नाशिक वन विभाग अहमदनगर वन विभाग हिंगोली वन विभाग व पुणे वन विभागांमध्ये समायोजित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली .

१. वास्तविक तह परभणी वन विभाग हा दिनांक ०१-०३-१९७६ पासून अस्तित्वात असलेला जुना वन विभाग असून येथे भा.व.से.( )संवर्गातील उपवनसंरक्षक दर्जाचे अधिकारी कार्यरत होते परंतु सन २००९ मध्ये जाणीवपूर्वक याचे विभाजन करून हिंगोली येथे स्वतंत्र उपवन विभागाची निर्मिती करण्यात आली व कालांतराने सन २०१२ पासून सदरचे पदे हे विभागीय वन अधिकारी दर्जाचे करण्यात आले.

२. याउलट आता परभणी येथील उपवनसंरक्षक दर्जातील भा.व.से. संवर्गातील अधिकाऱ्यांचे पद रद्द करून विभागीय वन अधिकारी हे पद केले व त्यानंतर हे पद देखील व्यपगत करून सहाय्यक वनसंरक्षक दर्जाचे पद निर्माण केले या पदाचा कोणत्याही प्रकारच्या कार्य कक्षा अधिकारीता घोषित न करता अघोषितपणे स्वतंत्र विभागीय वन अधिकारी याच नावाने मागील एक वर्षापासून कारभार सुरू आहे

३. परंतु शासनाचे अचानक दिनांक २५ मे २०२३ रोजी शासन निर्णय जारी करून परभणी येथील कार्यालय हिंगोली जिल्ह्यात समायोजित करण्याचा अन्यायकारक व एकतर्फी निर्णय घेतला परभणी वन विभागाचे हिंगोली जिल्ह्यांमध्ये समायोजन करण्याच्या प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारे स्थानिक लोकप्रतिनिधी/खासदार/ आमदार यांना देखील विचारात घेतले नाही किंवा त्यांचे देखील मते मागविण्यात आलेली नाही.

४. शासन स्तरावरून मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यावर नेहमीच अन्याय होत असून अन्यायाची शिकार होत असल्याचे द्योतक म्हणून सदर कार्यालय दुसऱ्या जिल्ह्यात हलविण्याचा घाट घालण्यात आलेला

५. वन विभागाचा शेतकऱ्यांची फारच जवळचा संबंध आहे वन्य प्राण्यापासुन होत असलेल्या शेत पीक नुकसानीची भरपाई मंजूर करणे,वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी मृत्युमुखी पडलेल्या मनुष्यांना नुकसान भरपाई मंजूर करणे, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जखमी मृत्युमुखी पडलेल्या पशुपालकांना नुकसान भरपाई मंजूर करणे, अशा प्रकरणात वारंवार विभागीय कार्यालयास खेटे घालावे लागतात अशा परिस्थितीत परभणी येथील विभागीय कार्यालय बंद केल्यामुळे हिंगोली येथे जाण्यासाठी शेतकऱ्यांना किमान १७५ ते २०० किलोमीटर विनाकारण प्रवास करावा लागणार आहे ज्यामुळे शेतकऱ्यांची मानसिक व आर्थिक शारीरिक कुचंबना होणार आहे

६. शेतकऱ्यांचा त्यांच्या मालकी शेतातील झाडांना तोड परवानगी व वाहतूक परवानगी सारख्या कामासाठी देखील फार मोठ्या प्रमाणावर वनविभागाशी संबंध येतो अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना नाहक त्रास देखील सहन करावा लागणार आहे या एक प्रकारे शेतकऱ्यावर हेतुपुरस्सर पणे अन्याय करत असल्याचे सिद्ध होत आहे

७. परभणी जिल्ह्यात जवळपास शंभर आरा गिरण्या कार्यरत असून या आरा गिरणी धारकांना देखील आता वार्षिक परवाना नुतीकरण करणे, विविध परवानग्या घेणे माहिती सादर करणे यासाठी हिंगोलीला जावे लागणार आहे आधीच लाकडांचा वापर कमी झाल्यामुळे आरा गिरणी धारकांचे व्यवसायात तोट्यात आहे आता शासनाकडून हा आर्थिक भुर्दंड झाल्यामुळे आधीच मागास असलेल्या जिल्ह्याचे आर्थिक कंबरडे मोडणार .

८. '' निर्णय '' वेगवान ट गतिमान अशी जाहिरात शासन मोठ्या दिमाखात करत असताना कार्यरत शासकीय विभागाचे जिल्हा बाहेर स्थलांतर करून एक प्रकारे कामाच्या वेगास सखोडा घालत आहे अशा वेळी आपल्या सरकारकडून वेगवान निर्णयाची अपेक्षा कशी करावी ? हाच परभणीकरांना मोठा प्रश्न पडलेला .

९. सद्यस्थितीत महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष माननीय मुख्यमंत्री यांचे संकल्पनेतून '' शासन आपल्या दारी '' ही महत्त्वाकांक्षी योजना राज्यात राबविल्या जात आहे या योजनेतून शासन जास्तीत जास्त लोकाभिमुख महत्त्वकांक्षी योजना राबविल्या जात .

Made with Xodo PDF Reader and Editor




भरोसा और
निवेशकों को पहला स्थान
मूल्यों की नींव पर
मध्यप्रदेश की उड़ान




नरेन्द्र मोदी, प्रधानमंत्री
डॉ. मोहन यादव, मुख्यमंत्री, मध्यप्रदेश

# ग्लोबल इन्वेस्टर्स समिट

## इन्वेस्ट मध्यप्रदेश

— अनंत संभावनाएं —

**24-25 फरवरी 2025, भोपाल**



### असीमित संभावनाएं एवं निवेश का समृद्ध इकोसिस्टम आपके लिए तैयार हैं

**आकर्षक नीतियां**
पारदर्शी नीतियों के साथ
कस्टमाइज्ड पैकेज

**ईज़ ऑफ डूइंग बिज़नेस**
EODB रैंकिंग में अग्रणी राज्य

**आधुनिक आधारभूत संरचना**
340+ औद्योगिक पार्क (MSME, IT, EMS पार्क सहित) 7 स्मार्ट सिटीज़, 5 आईटी सेज़

**पावर सरप्लस**
31 GW स्थापित क्षमता
30% स्वच्छ ऊर्जा

**स्ट्रेटजिक कनेक्टिविटी**
6 हवाई अड्डे, 20 रेलवे जंक्शन, 6 ड्राई पोर्ट
1 मल्टी-मॉडल लॉजिस्टिक्स पार्क

**व्यापक औद्योगिक लैंड बैंक**
1 लाख + एकड़

**विस्तृत रोड नेटवर्क**
5 लाख + किमी रोड नेटवर्क
46 राष्ट्रीय राजमार्ग

**पर्याप्त जल आपूर्ति**
उद्योगों के लिए 1000 + मिलियन घनमीटर जल उपलब्ध

रजिस्ट्रेशन के लिए स्कैन करें

www.investmp.in

सीधा प्रसारण | @Cmmadhyapradesh @jansampark.madhyapradesh | @Cmmadhyapradesh @jansamparkMP | JansamparkMP | #InvestInMP | #MPGIS2025